जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

# राहुरीच्या निवडणुकीत 'तनपुरे फॅक्टर' मोकाटे की कर्डिलेंच्या पथ्यावर पडणार

राहुरी विधानसभेच्या पोटनिवडणुकीतून राष्ट्रवादी शरद पवार गटाचे माजी आमदार प्राजक्त तनपुरे यांनी माघार घेतली असा प्रचार होत असला तरी ही लौकिक अर्थाने माघार नाही. कारण त्यांनी उमेदवारी दाखल केली नव्हती. परिणामी ते निवडणूक रिंगणातून बाहेर राहिलेत हीच वास्तवता आहे. त्यांना राष्ट्रवादीने उमेदवारी नाकारली नव्हती तर तनपुरेंनी भाजपच्या विशेषतः मुख्यमंत्री फडणवीस यांच्या आग्रहाखातर विजयाची दाट शक्यता असताना सुद्धा निवडणूक सोडली त्याची कारणमीमांसा संशोधनाचा विषय ठरतो. पण या निमित्ताने ते स्वतःहून भाजपच्या वॉशिंग मशीनमध्ये गेलेत ही बाब सकृत दर्शनीय मान्य करावी लागेलच तनपुरे रिंगणातून बाहेर असले तरी ही निवडणूक माजी आमदार स्व.कर्डिले यांच्या सहानुभूती ऐवजी तनपुरे यांच्या नावाभोवतीच केंद्रित होत आहे. त्यामुळे याचा राजकीय लाभ भाजपचे अक्षय कर्डिले की राष्ट्रवादीचे गोविंद मोकाटे यांना होणार हे यथावकाश स्पष्ट होईल. वास्तविक तनपुरेंना निवडणूक रिंगणातून बाहेर ठेवण्याची भाजपचीच खेळी पण त्यामुळे स्व. कर्डिले यांच्या सहानुभूतीऐवजी ही निवडणूक तनपुरे यांच्या भोवतीच केंद्रित झाली मग तनपुरे समर्थक हे कर्डिले यांना कितपत स्वीकारतील. कारण काल–परवापर्यंत तनपुरे कर्डिलेंचे कार्यकर्ते राजकीयदृष्ट्या एकमेकांना भिडत होते. अचानक ते कर्डिले यांना कसे स्वीकारणार हा यक्षप्रश्न अनुत्तरीत राहतो. त्यात तनपुरे यांना आगामी राजकारणात स्पर्धक म्हणून कर्डिलेंचा पर्याय पुढे येईल ते कार्यकर्ते आणि त्यांचे मतदार स्वीकारतील का? मग या माघारीचा लाभ काय? त्यात स्वातंत्र्योत्तर काळात राहुरीची निवडणूक तनपुरे यांच्या नावाशिवाय क्वचितच झाली असेल. मग त्याचा राजकीय फायदा कर्डिले यांना कसा होणार त्यात राहुरीत कर्डिले हे तालुक्याच्या बाहेरचे उमेदवार हा प्रचार यापूर्वी आणि यावेळी सुद्धा होत आहे तो कसा थोपवणार? त्यात प्रतिस्पर्धी उमेदवार गोविंद मोकाटे हे नगर तालुक्यातील जेऊरचे असले तरी राहुरीच्या ब्राह्मणी आणि वांबोरीत त्यांचे आडनाव भावकी असल्याने ते राहुरीचे ठरतात ही त्यांची जमेची बाजू ठरते. विशेष म्हणजे गेल्या दोन विधानसभा निवडणुकीत गोविंद मोकाटे यांनीच नगर तालुक्यात तनपुरेंची खिंड लढवली होती. परिणामी त्यांच्या कार्यकर्त्यांशी मोकाटे यांचा थेट संपर्क आहे. तनपुरे हे विसरले तरी कार्यकर्ते याची जाणीव ठेवण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यात तनपुरे यांनी माघार घेतली असली तरी प्रचार कोणाचा करणार हे गुलदस्त्यात ठेवले हे त्यांच्यापुढे धर्मसंकटच आहे. राष्ट्रवादीत राहून ते भाजपचा उघड प्रचार सध्या तरी करू शकणार नाही. त्यांना थेट भाजपत प्रवेश करावा लागेल पण तसे झाले तर आगामी निवडणुकीत भाजप त्यांना उमेदवारी देणार का? तनपुरे यांनी गुंतागुंतीचे राजकारण करून स्वतःलाच राजकीय पर्याय आणि स्पर्धक तयार केलेत त्याचा त्यांच्या राजकारणावर दुरगामी परिणाम संभवतो.

श्रीगोंदा पॅटर्न

अहिल्यानगर जिल्ह्याच्या राजकारणात श्रीगोंद्याचा एक आगळा–वेगळा पॅटर्न आहे. त्या मतदारसंघातही माजी आमदार राहुल जगताप यांनी सुद्धा गेल्या निवडणुकीत श्रीगोंद्यातून राष्ट्रवादीचे तिकीट नाकारले होते ते ज्या राष्ट्रवादीचे आमदार होते. त्यांचीच उमेदवारी दहा वर्षांपूर्वी नाकारली. त्यामुळे त्यांना पुन्हा संधी मिळाली नाही ते कुकडी साखर कारखान्यापुरतेच राजकीयदृष्ट्या मर्यादित राहिले हा ताजा इतिहास सुद्धा राजकीय निरीक्षकांना नाकारता येणारच नाही. जी माजी आमदार राहुल जगताप यांची स्थिती झाली. त्यापेक्षा वेगळी अवस्था तुर्तातूर्त माजी आमदार प्राजक्त तनपुरे यांची नाही.

### तुकाराम गडाखांची पुनरावृत्ती

राहुरी विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने यापूर्वीच्या शेवगाव–नेवासा विधानसभा निवडणुकीत एकेकाळी जी राजकीय स्थिती होती त्याची पुनरावृत्ती होते की काय अशीच कमी–अधिक प्रमाणात स्थिती उद्‌भवलेली दिसते. त्या निवडणुकीत ज्येष्ठ नेते स्व. मारुतराव घुले आणि स्व. तुकाराम गडाख यांच्यात लढत झाली. मतदानपूर्व अंदाज असा होता की मारुतराव घुले राज्यात सर्वाधिक मतांनी विजयी होतील ते राज्याचे सहकार मंत्री राहतील अशी सार्वत्रिक चर्चा झडली पण निवडणूक निकालात स्व. तुकाराम गडाख विजयी झाले. हा राजकीय इतिहास घडला. वास्तविक तुकाराम गडाख हे नकारात्मक मतांवर विजयी झाले त्यांचा फारसा प्रचारही नव्हता. तरी जनतेने निवडणूक मतपेटीद्वारे हाती घेतली तो राजकीय चमत्कार होता. आता ती किमया मोकाटेंच्या माध्यमातून राहुरीत होणार का याची प्रतीक्षा करावी लागेल.

### सहानुभूतीचा फॅक्टर

आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या अकाली निधनामुळे राहुरी विधानसभेची पोटनिवडणूक होत आहे. भाजपने त्यांचे चिरंजीव अक्षय कर्डिले यांना उमेदवारी दिली आहे. सहानभूतीच्या लाटेवर ते आरुढ झालेत पण बारामतीसारखी राजकीय स्थिती राहुरीत अभावानेच दिसते. बारामतीत मातब्बर पक्षाचा उमेदवार नाही पण तेथे सहानभूती मिळवणार. राष्ट्रवादी शरद पवार गटाने राहुरीत अधिकृत उमेदवार दिला, परिणामी सहानभूतीची लाट अडवण्याचा प्रयत्न होत आहे. अलीकडच्या राजकारणात सहानुभूती प्रभावी ठरत नाही हे पंढरपूरमध्ये भालकेंच्या निवडणुकीतून सप्रमाण पुढे आले. महाराष्ट्रात गाजलेल्या मस्साजोग सरपंच पदाची निवडणूक बिनविरोध होत नाही दिवंगत सरपंच देशमुख यांच्या पत्नीच्या विरोधात उमेदवार रिंगणात आहे, याचा अन्वयार्थ काय लावणार. सहानभूतीचा फॅक्टर प्रभावी ठरतो असे चित्र तूर्तातूर्त महाराष्ट्रात नाही मग राहुरीत काय होणार हे मतपेटीतून पुढे येईल.

**– रामदास ढमाले**

## बाजार अस्थिर वाटत असताना खरं तर काय करायला हवं?


राजन कुटे

गेल्या काही दिवसांत बाजार सरळ दिशेने चालत नाहीये. थोडी थांबलेली हालचाल, काही प्रमाणात गोंधळ आणि त्यातून अनेक गुंतवणूकदारांच्या मनात एक सामान्य प्रश्न निर्माण होतो – आत्ता काहीतरी करायला हवं का? हा विचार अगदी नैसर्गिक आहे. कारण बाजार वाढत असताना गुंतवणूक टिकवून ठेवणं सोपं वाटतं; पण जेव्हा तो थोडा थांबतो, हलतो किंवा घसरतो, तेव्हा मन आपोआप कृती शोधू लागतं.

अशा वेळी थोडा थांबून विचार करण्याची गरज असते, कारण प्रत्येक परिस्थितीत कृती आवश्यकच असते असं नाही. लहान कालावधीत बाजाराची हालचाल ही केवळ आपल्या गुंतवणुकीवर अवलंबून नसते; ती जागतिक घडामोडी, व्याजदर, तरलता, बाजारातील भावना आणि अपेक्षा यांसारख्या अनेक घटकांवर आधारित असते, ज्यातील बरंच काही आपल्या नियंत्रणाबाहेर असतं. मात्र आपल्या हातात एक महत्त्वाची गोष्ट असते – ती म्हणजे आपली प्रतिक्रिया.

प्रत्येक चढ–उताराला तत्काळ प्रतिसाद देण्याची सवय गुंतवणूकदाराला तात्पुरत्या अस्थिरतेला कायमस्वरूपी निर्णयांमध्ये बदलण्यास प्रवृत्त करते, आणि याच ठिकाणी अनेक दीर्घकालीन गुंतवणुकीचे प्रवास अडखळतात. जर गुंतवणूक एखाद्या स्पष्ट उद्देशाने, ठरलेल्या कालावधीसाठी आणि योग्य वाटपासह केली असेल, तर काही दिवसांची किंवा महिन्यांची अस्थिरता त्या पायाभरणीत बदल घडवत नाही. उलट, अशा काळात गुंतवणूकदाराच्या स्थिरतेची खरी परीक्षा होत असते. कारण संपत्ती ही केवळ उत्साहाच्या क्षणी निर्माण होत नाही; ती शिस्तीच्या काळात हळूहळू तयार होत असते.

बातम्या, बाजारातील घसरण, आजूबाजूच्या चर्चा किंवा त्वरित वाढ दिसत नसल्याची अस्वस्थता – अशी शंका निर्माण होण्याची कारणं नेहमीच असतात. मात्र अशा वेळी शांतपणे आढावा घेणं आणि आपल्या योजनेशी प्रामाणिक राहणं हे वारंवार बदल करण्यापेक्षा अधिक परिणामकारक ठरतं. याचा अर्थ गुंतवणूक दुर्लक्षित करणं असा नाही; तर ती योग्य पद्धतीने, प्रतिक्रिया न देता स्पष्टतेने हाताळणं आवश्यक आहे. गरज वाटल्यास पुनरावलोकन आणि संतुलन करता येतं, परंतु सतत हस्तक्षेप करणं टाळणं तितकंच महत्त्वाचं आहे.

गुंतवणुकीत सक्रियता अनेकदा उपयोगी वाटते; परंतु दीर्घकालीन परिणाम देतं ते शिस्तीचं पालन. त्यामुळे बाजार अस्थिर वाटत असताना नेहमीच अधिक काही करण्याची गरज नसते. अनेक वेळा, शांतपणे आणि सातत्याने पुढे चालत राहणं हाच सर्वात योग्य निर्णय ठरतो.

शांत ठेवा स्पष्ट ठेवा

– **राजन कुटे,** अँफी नोंदणीकृत मुच्यूअल फंड वितरक
मो. ९४०३३७४६७४ /९४२३७०८६७०

## शेअर मार्केटमध्ये गुंतवणुकीतून ज्यादा परताव्याच्या आमिषाने नगरमधील कंत्राटदाराची तब्बल ३ कोटी ५० लाखांची फसवणूक

नगर – शेअर बाजारामध्ये मोठी गुंतवणूक केल्यास भरघोस परतावा मिळवून देण्याचे आमिष दाखवून नगरमधील एका कंत्राटदाराची तब्बल ३ कोटी ५० लाख १३ हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात श्रीरामपूर येथील संशयित आरोपी विरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत प्रणव प्रवीण कटारिया (वय २९, रा. शिवनेरी मार्ग, स्टेशन रोड) यांनी १० एप्रिल रोजी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे व्यवसायाने कंत्राटदार आहेत. त्यांची आरोपी ओंकार संतोष हासे (रा. श्रीरामपूर) याच्याशी ओळख झाली होती. ओंकार याने फिर्यादीचा विश्वास संपादन करून त्यांना शेअर बाजारामध्ये गुंतवणूक करण्यास प्रवृत्त केले. एप्रिल २०२२ ते फेब्रुवारी २०२४ या कालावधीत आरोपीने फिर्यादीला गुंतवणुकीवर चांगला मोबदला देण्याचे आमिष दाखवले. या आमिषाला बळी पडून कटारिया यांनी वेळोवेळी ३ कोटी ५० लाख १३ हजार रुपये एवढी रक्कम आरोपीच्या खात्यावर जमा केली. मात्र, दीर्घ काळ उलटूनही आरोपीने ना परतावा दिला, ना मुद्दल रक्कम परत केली. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच कटारिया यांनी पोलीस प्रशासनाकडे धाव घेतली. अर्जाची चौकशी पूर्ण झाल्यानंतर १० एप्रिल रोजी याप्रकरणी आरोपी ओंकार हासे याच्या विरुद्ध भा.दं.वि. कलम ४०६ प्रमाणे गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे, पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांनी तातडीने भेट देऊन तपासाच्या सूचना दिल्या. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक कुणाल सपकाळे हे करत आहेत.

## ३ लाखांची वीजचोरी, गुन्हा दाखल

नगर – घरगुती वापराच्या वीज मीटर मध्ये छेडछाड करून वायर कट करून मीटर बायपास करत सुमारे ३ लाख ९ हजारांची वीज चोरी करणाऱ्या विरुद्ध महावितरणच्या च्या भरारी पथकाने कारवाई करत गुन्हा दाखल केला आहे. शहरातील बुरूडगाव रोड भागात ही कारवाई करण्यात आली आहे. याबाबत महावितरणचे भरारी पथकातील विनोद आसाराम पांढरे (वय ३५, रा. तवले नगर, सावेडी) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की वीज चोरीचे प्रमाणात वाढ झाल्यामुळे वीज ग्राहकांच्या मीटर व वीज पुरवठ्याची तपासणी करून वीज चोरी शोधून त्यावर कायदेशीर कारवाई करण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. या मध्ये १० मार्च रोजी भरारी पथकासह तपासणीकरिता बुरूडगाव रोड येथे फेमस पुरीभाजी जवळील मोहम्मदअली रईस शेख यांच्या घरी गेले असता शेख यांनी मीटरमध्ये छेडछाड केल्याचे निदर्शनास आले. त्यांनी एकूण १३ हजार ४४८युनिट वीज चोरी करून महावितरणचे ३ लाख ९ हजार १३५ रुपये इतक्या रकमेचे नुकसान केले असून त्यांना वीज चोरीचे बिल दिले मात्र त्यांनी भरणा केला नाही त्यामुळे त्यांच्या विरुद्ध भारतीय विद्युत कायदा कलम १३५ नुसार गुन्ह्याची नोंद केली आहे.

# शहर वाहतूक शाखेचा कारभार विस्कळीत; कार्यालयातील सीसीटीव्ही फुटेजची चौकशी करा, अन्यथा १७ एप्रिल रोजी विशेष पोलीस महानिरीक्षकांच्या दालनात अर्धनग्न आंदोलन करणार

### एजंटांचा सुळसुळाट : गृहमंत्री आणि विशेष पोलीस महानिरीक्षकांकडे तक्रार

नगर – शहरातील वाहतूक व्यवस्थेबाबत गंभीर आरोप करण्यात आले आहे. शहर वाहतूक विभागाचा कारभार सध्या पूर्णपणे विस्कळीत झाल्याचा आरोप अखिल भारतीय सह्याद्री छावा संघटनेच्या वतीने करण्यात आला आहे. या संदर्भात मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस आणि विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक विभाग यांना तक्रारीचे निवेदन प्रदेश कार्याध्यक्ष रावसाहेब काळे यांनी पाठवले आहे.

संघटनेच्या म्हणण्यानुसार, शहर वाहतूक विभागाच्या आशिर्वादाने खासगी वाहतुकीला खुलेआम मोकळीक दिली जात आहे. हप्ते वसुलीचा प्रकार जोरात सुरू असून, काही मर्जीतील कर्मचाऱ्यांना महत्त्वाचे पॉइंट देण्यात येत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच, हप्तेखोर एजंटांचा वाहतूक विभागाच्या कार्यालयात वारंवार वावर असल्याचेही निदर्शनास आणले गेले आहे. कार्यालयातील सीसीटीव्ही फुटेजची खातेनिहाय चौकशी करण्यात यावी, अशी मागणी संघटनेने केली असून, पोलीस महानिरीक्षक, नाशिक करण्याचा इशारा देण्यात आला



अन्यथा १७ एप्रिल रोजी विशेष यांच्या दालनात अर्धनग्न आंदोलन आहे.

संघटनेच्या तक्रारीनुसार, शहरात संख्या वाढली आहे. टिळक शिक्षकाचा मृत्यू झाल्याची घटना बालिकाश्रम रोडवरील बालकाचा मृत्यू, पत्रकार चौकातील अपघात अशा अनेक घटनांचा उल्लेख करण्यात आला आहे.

अवजड वाहनांमुळे अपघातांची रोडवर विना नंबरच्या डंपरने एका अद्यापही अनुत्तरित आहे. तसेच

शहरात अवजड वाहतूक बंदी असतानाही ही वाहने बिनधास्तपणे शहरात येत असल्याने नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. शेंडी बायपास आणि केडगाव बायपासवर पोलीस तैनात असूनही ही वाहने शहरात कशी प्रवेश करतात, असा सवाल उपस्थित करण्यात आला आहे.

पुणे बस स्थानक परिसरात खासगी वाहनांचे एजंट खुलेआम प्रवाशांना आकर्षित करून वाहनात बसवत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. शहरात अपघात होत असताना वाहतूक शाखेचे अधिकारी व कर्मचारी नेमके काय करत आहेत, असा संतप्त सवाल संघटनेने उपस्थित केला आहे. अपघातानंतर गुन्हे दाखल केले जात असले तरी संबंधित वाहने फरार होत असल्याने पोलिसांची प्रतिमा मलिन होत असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. या सर्व पार्श्वभूमीवर, संबंधित अधिकाऱ्यांच्या कार्यकाळातील सीसीटीव्ही फुटेज तपासून सखोल चौकशी करण्याची मागणी संघटनेने केली आहे.

## शांताबाई धोकरिया यांचे दु:खद निधन



नगर – पंचपीर चावडी, माळीवाडा येथील श्रीमती शांताबाई मोहनलाल धोकरिया (वय ८३) यांचे १० एप्रिल रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, सुना, ४ मुली, नातवंडे, जावई असा परिवार आहे. स्व. मोहनलाल गंगासाहाय धोकरिया यांच्या पत्नी तर श्री गणेश भूवनचे जितेंद्र, अजय धोकरिया यांच्या त्या मातोश्री होत.

## उषाबाई येनगुपटला यांचे अल्प आजाराने निधन



नगर – चितळे रोड पापय्यागल्ली येथील रहिवासी उषाबाई बंडोपंत येनगुपटला (वय ६३) यांचे ४ एप्रिल रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पती, १ मुलगा, ३ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ऋषिकेश येनगुपटला यांच्या त्या मातोश्री होत.

## जयश्रीबाई मुथा यांचे अल्प आजाराने निधन



नगर – सक्कर चौक, मुथा मळा, स्टेशन रोड येथील जयश्रीबाई रतिलाल मुथा (वय ७१) यांचे १० एप्रिल रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे १ मुलगा, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे, पुतणे, पुतण्या असा परिवार आहे. डॉ. रसिक मुथा यांच्या त्या भावजय, मनोज मुथा यांच्या चुलती तर आकाश, अक्षय, तन्मय, शेजल मुथा यांच्या आजी, सचिन मुथा व संगीता मुनोत यांच्या मातोश्री तर प्रा. मोहन कामत, दिलीप कामत यांच्या त्या बहीण होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.


एमजी रोड कापड बाजार व्यापारी असोसिएशनच्यावतीने आयोजित पत्रकार परिषदेत भूमीका मांडताना व्यापारी.

## 'पे ॲण्ड पार्क' राबविल्यास गांधीवादी मार्गाने आंदोलन

(पान १ वरुन)

आकारणे अन्यायकारक असल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. इतर शहरांमध्ये अशा प्रकारची व्यवस्था नसल्याचेही त्यांनी सांगितले.

एमजी रोड कापड बाजार व्यापारी असोसिएशनच्या वतीने घेतलेल्या पत्रकार परिषदेत या योजनेविरोधात तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांकडे तसेच महापालिकेकडे अधिकृत हरकती नोंदवण्यात आल्या आहेत. तथापि, प्रशासनाने या मागण्यांकडे दुर्लक्ष करून योजना जबरदस्तीने राबवण्याचा प्रयत्न केल्यास गांधीवादी मार्गाने आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला. त्यामध्ये एमजी रोड कापड बाजारातील दुकाने बंद ठेवून धरणे आंदोलन करण्यात येणार असून त्याची सर्व जबाबदारी प्रशासनावर राहील, असे स्पष्ट करण्यात आले.

शहरातील नागरिक व नव्याने निवडून आलेल्या नगरसेवकांनी या मागणीला पाठिंबा द्यावा, तसेच एमजी रोड कापड बाजाराचा 'पे ॲण्ड पार्क' योजनेतून तात्काळ वगळावा, अशी मागणी व्यापारी संघटनेने केली आहे. या पत्रकार परिषदेस शामराव देडगावकर, ईश्वर बोरा, किरण व्होरा, कमलेश आहूजा, संभव काठेड, विशाख वैद्य, रुपेश नहाटा, राहुल मुथा, प्रकाश बायड, भागचंद रामसिंगानी आदी उपस्थित होते.

## २७ एप्रिल रोजी 'निधी आपके निकट' कार्यक्रमाचे आयोजन

नगर – निवृत्तीवेतनधारक तसेच कंपनीचे नियोक्ते आणि प्रतिनिधी यांच्यासाठी 'निधी आपके निकट' हा विशेष कार्यक्रम २७ एप्रिल रोजी सकाळी ९.३० वाजता श्री जगदंबा देवी सार्वजनिक ट्रस्ट, मोहटे ता. पाथर्डी जि.अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आला आहे. भविष्यनिर्वाह निधीशी संबंधित कोणत्याही प्रकारच्या तांत्रिक किंवा प्रशासनिक अडचणी असल्यास आवश्यक कागदपत्रांसह या कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन कर्मचारी भविष्य निधी संघटनेचे सहायक भविष्य निधी आयुक्त यांनी केले आहे.

# राहुरी विधानसभा पोटनिवडणूक प्रक्रिया निष्पक्षपणे पार पाडावी

### जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया


राहुरी येथे आयोजित निवडणूक पूर्वतयारी आढावा बैठकीत बोलताना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया.

नगर – राहुरी विधानसभा पोटनिवडणूक प्रक्रिया पारदर्शक, निष्पक्ष आणि सुरळीत पार पाडण्यासाठी नियुक्त सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपली जबाबदारी दक्षतेने पार पाडावी, अशा सूचना जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिल्या.

राहुरी येथे आयोजित निवडणूक पूर्वतयारी आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस उपजिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी अनुपसिंह यादव, श्रीरामपूरचे उपविभागीय अधिकारी किरण सावंत–पाटील यांच्यासह विविध विभागांचे समन्वय अधिकारी व क्षेत्रीय अधिकारी उपस्थित होते.

डॉ. आशिया म्हणाले, निवडणूक कामकाजात कोणत्याही स्तरावर हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही. कर्तव्यात कसूर करणाऱ्यांवर कठोर प्रशासकीय कारवाई करण्यात येईल. मतदानाच्या दिवशी मतदारांची गैरसोय होऊ नये, यासाठी प्रत्येक मतदान केंद्रावर पिण्याचे पाणी, अखंडित वीजपुरवठा, पुरेशी सावली तसेच दिव्यांगांसाठी रॅम्प यांसारख्या आवश्यक सोयी–सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

यावेळी त्यांनी निवडणूक प्रक्रियेतील महत्त्वाचा घटक असलेल्या मनुष्यबळ नियोजनावर विशेष भर दिला. टपाली मतदान प्रक्रिया राबविताना आवश्यक ती खबरदारी घ्यावी. तसेच, ईव्हीएम सुरक्षितपणे हाताळून त्याचे व्यवस्थापन करताना निवडणूक आयोगाच्या तांत्रिक निर्देशांचे काटेकोर पालन करावे, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

बैठकीत निवडणूक यंत्रणेच्या सज्जतेचा सविस्तर आढावा घेण्यात आला. तसेच, आचारसंहितेच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहितीही जिल्हाधिकाऱ्यांनी घेतली.

बैठकीनंतर जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी ईव्हीएम ठेवलेल्या सुरक्षा कक्षाची, मतमोजणी केंद्राची तसेच मतदान केंद्रांची पाहणी केली. मतदानाच्या दिवशी कोणतीही तांत्रिक किंवा प्रशासकीय अडचण उद्भवू नये, यासाठी सर्व पूर्वतयारी विहित मुदतीत पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

### २३ एप्रिल रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर

राहुरी विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदानाच्या दिवशी २३ एप्रिल रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने यासंदर्भात अधिसूचना जारी केली आहे. ही सुट्टी मतदारसंघाच्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांसह कामानिमित्त मतदारसंघाबाहेर असलेल्या मतदारांनाही लागू राहणार आहे. त्यामुळे सर्व पात्र मतदारांना आपला मतदानाचा हक्क बजावणे सुलभ होणार आहे. सदर अधिसूचना राज्य व केंद्र शासनाच्या कार्यालयांसह निमशासकीय कार्यालये, सार्वजनिक उपक्रम तसेच इतर आस्थापनांनाही लागू होणार आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### थाईज जाड झाल्या तर...

लठ्ठपणा सध्या अत्यंत मोठी गंभीर समस्या होत चालला आहे. लठ्ठपणामुळे डायबिटीस, थायरॉईडसारखे गंभीर आजार होऊ शकतात. यापासून वाचण्यासाठी आपण सर्वांनीच योग्य वेळी पाऊल उचलायला हवे. पोट आणि मांड्यामध्ये जमा झालेली चरबी जाळण्यास अत्यंत त्रास होतो. कारण मांड्यावरील लटकलेली चरबी पटकन कमी होत नाही. पायासाठी ब्रिक्स वॉकिंग उत्तम व्यायाम मानला जातो. यामुळे पाय टोन्ड अप होतात. मेटाबॉलिजम वाढून संपूर्ण शरीरातील चरबी त्वरीत कमी होण्यास मदत मिळते. इतकंच नाही तर तुम्ही रोज ब्रिक्स वॉकिंग करत असाल तर त्याचा स्क्वॉट्स, हॅमस्ट्रिंगसारख्या मसल्सवरही चांगला परिणाम होतो आणि तुमच्या मांड्यावरील जाडी कमी होण्यास मदत मिळते.

## पाककला

### मेथी-मटार पनीर पुलाव

**साहित्य :** बासमती किंवा ब्राऊन राइस, ताजी मेथी, मटार, पनीरचे तुकडे, खडा मसाला (दालचिनी, लवंग, तमालपत्र), आलं-लसूण पेस्ट.

**कृती :** कढईत थोडे तूप घालून पनीरचे तुकडे परतून घ्या. त्यात खडा मसाला आणि आलं-लसूण पेस्ट टाका. बारीक चिरलेली मेथी आणि मटार परतून घ्या. भिजवलेला तांदूळ टाकून आवश्यकतेनुसार पाणी आणि मीठ घालून शिजवा. वरून तळलेले पनीरचे तुकडे टाका. हा पुलाव रायत्यासोबत छान लागतो.

## वास्तू

### श्रीमंतीसाठी...

* हळद, केशर यांचा टिळा लावण्या मुळे श्रीमंती येते. रोख रक्कम हातात पडली की ती घरी आणून देवापुढे ठेवावी. कुठल्याही परिस्थितीत त्यातील एक रुपयाही खर्च करु नये दुसऱ्या दिवसापासून खर्च करायला सुरुवात करावी.

* बुधवारी पैसे कोणास उधार देऊ नयेत. दिल्यास ते बुडतात व वसुलीला त्रास होतो.

* गुरुवारी पैसे देणे चांगले, मंगळवारी कर्जाचे पैसे देऊन कर्जफेड करावी. वा शुक्रवारी कर्जफेड स्थितीत सुधारणा होते. मंगळवारी पैसे/कर्ज घेतल्यास ते लवकर फिटत नाहीत.

* सूर्यास्तानंतर मोठी खरेदी केल्यास व पैसे दिल्यास लक्ष्मी नाश पावते.

## सौंदर्य

एलोवेराचा वापर अनेक जण करत असतात एलोवेराचे पान चेहरा गोरा होण्यासाठी फायदेशीर असतात यामधे अनेक प्रकारचे प्रोटीन आणि विटामीन असतात जे आपल्या सुंदरतेसाठी खुप फायदेशीर असतात त्याच बरोबर एलोवेरा आपल्या मृत त्वचेला काढून टाकण्याच काम करते रोज रात्री एलोवेरा जेल चेहऱ्याला लाऊन झोपा आणि सकाळी उठल्यावर चेहरा धुवून टाकावा

## सल्ला

* रवा दुकानातून आणल्यावर हलकासा भाजून कोरड्या डब्यात भरून ठेवावा म्हणजे ऐन वेळेला शिरा पटकन करता येईल.

* कांदा-खोबरं, लसूण यांचे आठवडा भराच वाटण तयार करून ठेवा म्हणजे उसळी वगैरे बनवता येतील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

रविवार, दि. १२ एप्रिल २०२६

**---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, चैत्र कृष्णपक्ष, श्रवण १५।१४, सूर्योदय ०६ वा. २८ मि. सूर्यास्त ०५ वा. ३० मि.**

### राशिभविष्य

**मेष :** ज्यांच्याबरोबर आपणास वेळ घालवणे आवडते त्यांना वेळ द्या. घरगुती बाबतीत अधीरता असेल. मागील उधारी वसुल होईल.

**वृषभ :** अनुकूल ते सहकार्य मिळेल. वेळेचे सदुपयोग केल्याने लाभ मिळेल. कौटुंबिक वेळ अनुकूल राहील. काळजीपूर्वक कार्य करा.

**मिथुन :** कामात व्यस्तता अधिक असल्यामुळे आरोग्यावर विपरीत प्रभाव पडू शकतो. आपल्या प्रिय व्यक्तींचा सहवास लाभेल.

**कर्क :** मैत्रिण किंवा प्रेयसी भेटेल. छोट्या-छोट्या अडचणी येतील. कुटुंबिय व मित्रांचा सहवास लाभेल. वरिष्ठांचे मार्गदर्शन लाभेल.

**सिंह :** प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी आपल्या मित्रांचा व आपल्या कौटुंबिक सभासदांचा सहयोग घ्या.

**कन्या :** आरोग्य नरम-गरम राहील. नोकरदार मंडळीनो काळजीपूर्वक काम करा. वाहने व उपकरणे जपून चालवावीत.

**तूळ :** आपल्या व्यवहारांमध्ये सावधगिरी बाळगा. आजचा दिवस छान जाईल. आरोग्य उत्तम राहिल. मागील उधारी व उसनवारी मिळेल.

**वृश्चिक :** आपल्या कामांमध्ये मित्रांचा सहयोग मिळेल. शत्रूंपासून सावध राहा. व्यापार-व्यवसायात देवाण-घेवाण टाळा.


**धनु :** कोणतेही कार्य सहजरित्या होणार नाही. मुले त्रास देऊ शकतात. जुने सहकारी भेटल्यामुळे आठवणींना उजाळा मिळेल. आर्थिक व्यवहार जपून करा.

**मकर :** शत्रूंपासून सावध राहाल. व्यापार-व्यवसायात देवाण-घेवाण टाळाल. पितृचिंता सतावेल. गुरुजनांचे आशिर्वाद घ्यायला जाल.

**कुंभ :** यवहारांमध्ये सावधगिरी बाळगाल. कोणतेही कार्य सहजरित्या होणार नाही. जुने मित्र-मैत्रिणी भेटण्याची दाट शक्यता आहे.

**मीन :** शैक्षणिकवबौद्धिकक्षेत्रातीलव्यक्तींना दिवस चांगला जाईल. आर्थिक लाभाचे प्रमाण समाधानकारक राहील. बाहेरचे जेवण शक्यतो टाळावे.

# शब्दगंध क्र. ७४०७ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** २) राजाचे मोठे सुशोभित घर ६) सर्वांना समान आर्थिक संधी हे सांगणारा विचार ८) दुर्दशा; परवड ९) हर; प्रत्येक; महादेव; शंकर ११) पाण्याचे वायुरूप १३) गजानन; गणेश; गणनायक १५) समुद्रात लागलेली आग १७) गोळा १८) एक धान्य; जव; सातू २०) गवंड्याचे एक हत्यार; थापी २२) उंटाच्या पाठीवरचा उंचवटा; भिस्त २३) पूर्ण भरतीची वेळ २४) खिडकी; झरोका; गवाक्ष

**उभे शब्द :-** १) सैन्याला पुरविला जाणारा दाणागोटा, शस्त्रे वगैरे; कुमक २) राजेश खन्नाचा सुरुवातीच्या काळातील एक हिंदी चित्रपट ३) भारतीय सैनिक; युवक; तरुण ४) मतभिन्नता; भांडण; कलह ५) एक कुविद्या ७) राजस्थानातील एक भाग १०) झाडाच्या पानांपासून बनविलेले वाटीसारखे पात्र १२) तुषाररूपी सिंचन १३) गोंधळ; गलबला; गडबड; गदारोळ १४) ज्ञानेश्वरीच्या शेवटी संत ज्ञानेश्वरांनी मागितलेला प्रसाद १५) मुख्य धान्ये इतर बाकीची १६) नूतन; नवीन १९) आशीर्वाद; नवरा मुलगा २१) विष्णूची पत्नी; लक्ष्मी २२) महाभारत कथेतील एक राक्षस ज्याच्या रचनेने कौरव फसले होते

### शब्दगंध क्र. ७४०६ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| म | क | रा | ल | य | ■ | वि | मा |
| ग | र | ■ | स | म | स | मा | न |
| र | स | ना | ■ | ■ | दा | न | व |
| मि | न | त | वा | री | ■ | ■ | ता |
| ठी | ■ | ल | ता | ■ | धा | स | ■ |
| ■ | ला | ग | व | ड | ■ | घा | स |
| ■ | हो | ■ | र | च | ना | ■ | म |
| स | र | प | ण | ■ | ग | वा | क्ष |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार** : जीवनात वेळेचे भान असणे आणि वेळीच भानावर येणे अत्यंत आवश्यक आहे.

# मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

## आजकाल गाड्यांमध्ये दिवसा चालू राहणाऱ्या लाईटस् का असतात?

DRL म्हणजे Daytime Running Lamps. हि संकल्पना खरंतर ज्यांना नॉर्डिक देश म्हणतात तिथून उदयास आली (स्वीडन, नॉर्वे, आइसलँड, डेन्मार्क आणि उत्तर कॅनडा). वरील देशांमध्ये सूर्यप्रकाश उपलब्ध असणारा दिवसाचा वेळ आणि त्या प्रकाशाची प्रखरता हि खूपच कमी असते. १२ महिन्यातील फार तर २ महिनेच चांगला लख्ख सूर्यप्रकाश या देशांना मिळतो. बाकी काळ धूसर प्रकाश आणि ढगाळ वातावरण असते. अश्या वातावरणात समोरून येणाऱ्या गाडीकडे पटकन लक्ष जावे म्हणून या LED (Light Emitting Diode) ने बनलेल्या DRL ची योजना गाड्यांमध्ये करण्यात आली. साधा बल्ब सर्व दिशांनी प्रकाशकिरण उत्सर्जित करत असतो (साधा बल्ब म्हणजे नियंत्रित मशाल असते) परंतु LED लाईट मात्र एका ठराविक कोनातच प्रकाश उत्सर्जन करत असतो. म्हणून वातावरणात LED चा प्रकाश जास्त विखुरला जात नाही आणि लांबून सुद्धा पटकन नजरेत येतो. तसे पाहायला गेले तर भारतासारख्या विषुववृत्ताला जवळ असणाऱ्या देशांमध्ये DRL ची गरज नाही. पण तरी समोरून DRL चालू ठेऊन येणाऱ्या गाडीकडे आपली नजर चटकन जाते हे सत्य नाकारता येणार नाही. अजून एक महत्वाचा फायदा म्हणजे गाडीचे aesthetic appeal (सौन्दर्य) पण वाढते.

## आंब्याचे झाड

अनेक वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. एक राज्य होते त्या राज्याचा राजा न्यायप्रेमी होता. एके दिवशी राजा वेशात त्याच्या राज्यात फिरायला गेला. वाटेत त्याला एक म्हातारा माणूस एक लहान रोप लावताना दिसला.

कुतूहलापोटी राजा त्याच्याकडे गेला आणि म्हणाला, तू कोणत्या प्रकारचे रोप लावत आहेस? म्हातारा हळू आवाजात म्हणाला, आंबा. राजाने ते वाढण्यास आणि फळ देण्यासाठी किती वेळ लागेल याचा हिशोब केला. गणना केल्यानंतर त्याने त्या म्हाताऱ्याकडे आश्चर्याने पाहिले आणि म्हणाला, ऐका दादा, हे रोप वाढण्यास आणि फळ देण्यासाठी बरीच वर्षे लागतील, तोपर्यंत तू जिवंत राहशील का? म्हातारा राजाकडे पाहत होता. राजाच्या डोळ्यात निराशा होती. त्याला वाटले की म्हातारा असे काम करत आहे, ज्याचे फळ त्याला मिळणार नाही.

हे पाहून तो म्हातारा म्हणाला, तुम्हाला वाटत असेल की मी वेडेपणाचे काम करत आहे. ज्या गोष्टीचा फायदा होत नाही त्यावर कठोर परिश्रम करणे निरुपयोगी आहे, पण विचार करा की या म्हाताऱ्याला इतरांच्या कष्टाचा किती फायदा झाला आहे? त्याने त्याच्या आयुष्यात इतरांनी लावलेल्या झाडांपासून किती फळे खाल्ली आहे? मी ते कर्ज फेडण्यासाठी काही करू नये का? इतर त्यांची फळे खाऊ शकतात या भावनेने मी झाडे लावू नये का? जो फक्त स्वतःच्या फायद्यासाठी काम करतो तो स्वार्थी असतो. म्हाताऱ्याचा हा युक्तिवाद ऐकून राजा खूश झाला.

तात्पर्य : कधीही स्वतःचा स्वार्थ पाहू नये; तर नेहमी इतरांचा देखील विचार करावा.



# जीवन का अमृत (भाग १)

निमंत्रण है। आप इसे इतनी श्रद्धा के साथ सुने कि आप इसमें पूरी तरह खो जाएँ और अपने आप को इसके द्वारा परलोक में जाने दें, वहाँ के उच्चतर आनंद का लुत्फ उठाने के लिए ।

### निपुणता

२७. बेहतर नतीजे पाने के लिए गंभीरता से, लगातार कोशिश करने की जरूरत होती है। निपुणता बहुत धीरे-धीरे आती है, पर जिंदा सतुगुरु की दया, मार्गदर्शन और संरक्षण में हर सही कदम आगे की ओर जाता है । मन दूर-दूर तक फैला हुआ है और यह घूमता रहता है। यह ऐसा युगों-युगों से कर रहा है। इसको अवश्य ही प्रेम से और सच्ची कोशिशों के द्वारा दिव्य चक्षु पर बाँधना होगा । ये आपके कर्म नहीं हैं, जो आपको रोकते हैं, न ही ये आपके भजन- सिमरन में भूल चूक के लिए जिम्मेदार हैं, बल्कि यह आपके मन की धोखाधड़ी है। मन को, उचित योजना बनाकर और उस पर अमल करके, काबू में किया जा सकता है।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

केलेली असते ती आपण स्वीकारतो. पालक आपल्या मुलाबद्दल जे बोलतात तीच त्या मुलाची स्वत:ची ओळख बनते. मुलांसाठी पालक नेहमीच बरोबर असतात.

त्यामुळे, एखादी मुलगी तिच्या पालकांकडून एखादा नकारात्मक संदेश ग्रहण करते तेव्हा ती तो स्वीकरते, त्यालाच सत्य समजते आणि त्या नकारात्मक संदेशावर आधारित स्वत:ची प्रतिमा बनवते. भविष्यात या नकारात्मक प्रतिमेला छेद

### सकारात्मक संदेश

देणारे सकारात्मक संदेश तिला मिळाले तरीही तिच्यावर त्याचा खूप कमी परिणाम होतो कारण तिच्यातील दोष तिने लहानपणापासून आत्मसात केलेले असतात. असं असलं तरीही, एखादी व्यक्ती संपूर्ण आयुष्य बळीचा बकरा बनून व्यतीत करू शकत नाही.

सुरेश ओबेरॉय : पण प्रचंड नकारात्मक समजुतींनी त्या व्यक्तीला जखडलेलं असतं आणि इतर लोक सतत त्याच समजुती बिंबवत राहतात.

शिवानीदीदी : खरंय. पण आपण भूतकाळ बदलू शकत नाही. आता आपण स्वतःला बदलण्याच्या प्रवासाला निघालो आहोत. जगण्याची एक पद्धत म्हणजे भूतकाळाला शरण जाणं, जुन्या विचारपद्धती अवलंबणं आणि स्वत:वर टीका करत राहणं.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

बायको (वैतागून) : तुमच्या डोक्यात ना नुसतं शेण भरलय
नवरा : अच्छा, आता मला कळले की तू इतका
वेळ माझे डोके का खाते आहेस ते

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* थल्लिकी वंदनम् योजना कोणत्या राज्याने लाँच केली आहे?
– आंध्रप्रदेश

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# साहित्य सहवास – 'विद्येविना मती गेली...'

आज ११ एप्रिल. थोर समाजसुधारक, क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फले ह्यांची जयंती. जयंतीनिमित्ताने विनम्र अभिवादन. माझ्या माहिती, अभ्यासानुसार जगात दोनच व्यक्तींना महात्मा ही जनतेनं दिलेली उपाधी आहे – महात्मा ज्योतिबा फुले आणि महात्मा गांधी. महात्मा अर्थात महान आत्मा. विविध जाती-धर्माच्या व्यक्तींकरिता महत्मा फुलेंनी केलेली कार्य सूर्य, चंद्र असेपर्यंत कुणीही विसरु शकणार नाही. खरं तर महात्मा फुलेंच्या ऋणांतुन आपण कधीच मुक्त होऊ शकणार नाही. काळाच्या कितीतरी पुढचा विचार आणि काळाची पावलं ओळखुन कृती करणारे महात्मा फुले. आजच्या त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याचं स्मरण करुन त्यांना अभिवादन करणं हे आपल्या प्रत्येकाचं आद्य कर्तव्य आहे.

दोनशे वर्षांपूर्वीच्या काळाचा आपण विचार करु शकणार नाही. पण त्या काळाचा विचार केलाच पाहिजे. स्त्री म्हणजे चुल आणि मुल एवढाच संकुचित विचार करणाऱ्या व्यक्ती त्या काळात होत्या. तेव्हा महात्मा फुलेंच्या लक्षात आलं एक स्त्री शिकली की आख्खं कुटुंब शिकतं. महात्मा फुलेंनी सावित्रीबाईंना शिकवलं. सावित्रीबाईंनी, त्यावेळच्या अनेक व्यक्तींकडुन झालेला अवमान सहन करुन मुलींना शिकवलं. आज सावित्रीच्या लेकी प्रत्येक क्षेत्रात स्वतःला सिध्द करताहेत. महात्मा फुले म्हणतात– 'विद्ये विना मती गेली... इतके अनर्थ एका अनिकेने केले'– आपण शिक्षण घेतलं नाही, ज्ञान मिळवलं नाही तर मेंदुचा अर्थात बुध्दीचा वापर होणार नाही म्हणजेच चांगलं काय, वाईट काय हे समजणारंच नाही. बुध्दीशिवाय नैतिकता समजणार नाही. चांगले वर्तन काय असते हे समजणार नाही. नैतिकता समजली नाही तर प्रगतीच्या वाटा दिसणारच नाहीत. प्रगती नाही म्हणजे अधोगती निश्चित होणार. प्रगतीशिवाय मानवी जीवनाला काही अर्थ नाही. प्रगती नाही तर संपत्ती नाही.

अर्थात ह्या ठिकाणी संपत्तीचा अर्थ पैसाशी संबंधित आहे. अर्थ आपण कसा कमवु शकु शिक्षण, ज्ञानाशिवाय ? पैसा नाही तर आपण खचणारचना ? – हे सगळं कशामुळे होणार तर इतके अनर्थ एका अविद्येने केले. मनुष्य जीवनात शिक्षण घेणं, ज्ञान मिळवण्याचं अनन्य साधारण महत्व महात्मा फुलेंनी फक्त सात वाक्यांमध्ये सांगितलं आहे. त्यादृष्टीने विचार केला तर असं समजु की दोनशे वर्षांपूर्वी महिलांच्या बाबतीत जी बंधनं होती तीच बंधनं आजही असती तर? मुलींनी शिक्षण घेतलं नसतं, ज्ञान मिळवलं नसतं तर ? हा विचार फक्त एकदा करुन तर पाहा. आजही मुली, महिला घराबाहेर पडल्या नसत्या. सावित्रीबाईंनी मुलींना शिकवलं. ह्याच सावित्रीच्या लेकी आज, पुरुषांच्या खांद्याला खांदा लावुन प्रत्येक क्षेत्रात कार्यरत आहेत. मनुष्यजीवनात शिक्षण, ज्ञान ह्याचं महत्व अनन्यसाधारण आहे. ह्यापुढेही जाऊन असं म्हणता येईलकी शिक्षण घेणं, ज्ञान मिळवणं 'माणूस' घडवण्यासाठी जीवनावश्यक आहे.

६ वर्षांपूर्वी कोरोना महामारीच्या काळात आख्खं जग थांबलं होतं, घरात बसुन होतं. पण ऑनलाईन शाळा चालुच होत्या. शिक्षण घेणं, ज्ञान मिळवणं थांबलं नाही. शाळा, महाविद्यालयामध्ये शिक्षण मिळतं. शैक्षणिक अभ्यासक्रमाशिवाय अधिकचं अवांतर ज्ञान मिळवायचं असेल तर पुस्तकं वाचलीच पाहिजेत. समजा तुमचं एखादं ध्येय आहे. त्या ध्येयाच्या प्राप्तीसाठी शिक्षण घेता येईल. पण तेच ध्येय एखाद्या व्यक्तीने साध्य केलं असेल, ते पुस्तक रुपात त्याने मांडलं असेल आणि तेच पुस्तक तुम्ही वाचलं तर त्या पुस्तकामधुन मिळवलेलं ज्ञान थेट तुमच्या आत पोहचेल. ते ध्येय तुमच्या मनात, रक्तात मिसळेल आणि तुमची वाटचाल खऱ्या अर्थाने ध्येयाच्या दिशेने असेल. खरं तर महात्मा फुले जयंती हे आज 'साहित्य सहवास'साठी निमित्त आहे – शिक्षण, ज्ञानाचं आपल्या जीवनातलं महत्व अधोरेखित करण्याचं. ह्या थोर समाजसुधारकाच्या जयंती निमित्ताने अत्यंत बिकट परिस्थितीमुळे जे मुलं, मुली शिक्षण घेऊ शकत नाहीत, ज्ञान मिळवु शकत नाहीत अशा होतकरु गरजुंना शैक्षणिकदृष्ट्या दत्तक घेऊन, त्यांना शिकवु शकतो, तुमच्या कर्मातला काही भाग अत्यंत योग्य उपयोगात आणु शकता. हे करुन पाहा आणि त्या गरजु मुला, मुलीच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहा. ह्याचं समाधान, आनंद तुम्हाला शब्दांत व्यक्तच करता येणार नाही. अशिक्षित व्यक्ती आणि शिक्षित व्यक्ती ह्यांच्या विचार, आचारातला फरक आपल्याला लगेच लक्षात येतो. शिक्षण नसतं तर? हा विचारसुध्दा आपणं करु शकत नाही. शिक्षण घेणं, ज्ञान मिळवणं हे प्रत्येक व्यक्तीचं आद्य कर्तव्य आहे, असायलाच पाहिजे. शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रातलं फुले दाम्पत्याचं योगदान, हे आपल्यासाठी प्रेरणादायी आहे. आजच्या, महात्मा फुले जयंतीनिमित्ताने आपण शिक्षण व सामाजिककार्यामध्ये योगदान देण्याची सुरुवात करुया.

(लेख क्र.५९६)

**– सुनील राऊत**
माळीगल्ली, भिंगार, अहिल्यानगर
मो.९८२२७५८३८३

# आहारवेद – आरोग्य संवर्धन

### संत्री

लहान बालकांना दात येण्याच्या काळात नियमितपणे संत्रारस दिल्यास दात मजबूत व सरळ रेषेत येतात. कारण सहसा वेडेवाकडे व ठिसूळ दात हे कॅल्शिअम व 'क' जीवनसत्त्वाच्या अभावाने येतात व हे दोन्ही घटक संत्र्यामध्ये भरपूर आहेत. तापामध्ये पचनशक्ती मंदावते व त्यामुळे जिभेवर पांढरा थर जमा होतो. अशा अवस्थेत संत्रे आतील सालीसह चावून खावे. यामुळे जिभेचा पांढरा थर निघून तोंड स्वच्छ होते व मंदावलेली पचनशक्ती सुधारते. अति उष्णतेमुळे लघवीचे प्रमाण कमी होऊन जळजळ जाणवल्यास संत्रारस एक-एक ग्लास तीन वेळा प्यावा. याने शरीरातील उष्णता कमी होऊन लघवी साफ होते व जळजळ नाहीशी होते. संत्र्यापासून संत्रारस, जॅम, जेली, अत्तर, सुगंधी तेल, संत्रासाल सूक्ष्म चूर्ण असे अनेक पदार्थ बनवता येतात.

सावधानता : सर्दी, खोकला झाला असेल, तर अति आंबट चवीचे व कच्चे संत्रे खाऊ नये. याने खोकला अजूनच वाढू शकतो.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# आपण खरचं... जिवंत माणसांमधेच रहातोय ना...

आपण प्रत्येकजण म्हणतो हल्ली माणसांमध्ये माणुसकी जिवंत राहिलेली नाही. अहो माणुसकीचे काय घेऊन बसलात मुळात माणूस नावाचा प्राणी नावाला जीवंत आहे. त्याच्या माणसाप्रती असलेल्या सर्व भावना मरून गेलेल्या आहेत. सोशल मीडियावर आपण अनेक व्हिडीओ बघत असतो. अगदी क्षुल्लक कारणावरून भररस्त्यात भरचौकात सपासप वार करून त्याला संपवले जातय. आणि आम्ही मात्र मधस्थी न करता फक्त मोबाइलमधे तो कसा मारतोय मरणारा मला वाचवा म्हणून कशी विनंती करतोय हे चित्रीकरण करण्यामधे मग्न असतोय. पूर्वीचा काळ पूर्वीचा माणूस कमी शिकलेला होता पन समाजाप्रती तो माणूस म्हणून खुप चांगला होता. जुन्या माणसांच्या अंगी दयामाया ममता ठासून भरलेली होती. एकमेकांप्रती आदर करणारी ती माणसं होती. गावात कुठे काही भांडणे झाली तर मधस्थी करून ती तिथल्या तिथे मिटवली जात होती दोघांनाही समजून सांगितले जात होते. आणि तेदेखील मध्यस्थींच्या शब्दांचा मान राखून ऐकत होती. आणि पुन्हा गावामधे गुण्यागोविंदाने मिळून मिसळून रहात होती. आज माणूस नावाला माणूस राहिला आहे. पूर्वी माणस राक्षसाला घाबरत होती. पन आता माणूस माणूस नावाच्या राक्षसालाच घाबरत आहे. सोशल मीडियावर आपण अनेक व्हिडीओ पाहतो ज्यामधे छोट्या छोट्या चुकीसाठी टोळक्याकडून एखाद्याला अमानुष मारहाण केली जाते व त्याची हत्या केली जाते. काहीच वाटत नाही या तरुणपिढीला. फक्त बदला घ्यायचा असतो यांना. अरे एवढच गरम रक्त आहे तर घरपरिवाराची परिस्थिती सुधारण्यासाठी कष्ट करा वाईट मार्गाने जिवन जगाल तर शेवट हा वाईटच होणार.

शून्य मिनटाचा राग अनावर झाला कि हे राक्षस माणसांना जिवंत माणसां समोर तडातड तलवारीने काठ्यांनी चाकूने तोडतात. एखाद्याची कितीही आणि कसलीही चूक होऊ द्या त्याला पोलिसांच्या ताब्यात दया. जेलची हवा खाऊन बाहेर आला कि त्याच्यामधे थोडी तरी सुधारणा होईल. पन अस माणसाला माणसासमोर रस्त्यावर संपवू नका हो. भिती वाटतेय या समाजात या राक्षसरूपी माणसामधे राहण्याची. या पिढीमधे सहनशिलता नावाचा प्रकारच राहिलेला नाही. छोट्याछोट्या गोष्टींचा राग यांना जराही सहन होत नाही. पूर्वीचा माणूस कायद्याला घाबरून रहात होता त्यामुळे तो चुका करत नव्हता. आता महिलांना सुद्धा भररस्त्यात अमानुषपणे मारहाण केली जाते. नुसती मारहाणच नव्हे तर तिचीदेखील हत्या केली जाते आणि आमचे नावाला जिवंत असलेली माणस हा रक्तरंजीत खेळ ऊघड्या डोळ्यांनी पाहतात आणि त्याचे चित्रीकरण मोबाइलमधे टिपतात. सगळ्यांना जगायचा अधिकार आहे हो. नुकताच नांदेडमधील एका घटनेचा व्हिडीओ पाहण्यात आला. त्यामधे आजुबाजुला वर्दीमधे असणारे पोलिस दिसत आहेत आणि त्यांच्यासमोर एकजण दुसऱ्याला भोकसत आहे पोलिसांनी जराही तसदी घेतली नाही त्याला वाचवण्याची. फक्त बघ्याची भुमिका त्यांनी चोखपणे पार पाडली. समोरचा एक माणूस होता एवढच पहायचे होते पोलिसांनी आणि त्याचा जीव वाचवायचा होता. जनतेचे रक्षक खरचं जनतेचे रक्षण करतात का ? आणि करतील का ? हा प्रश्न मात्रमनाला भेडसावतोय. नांदेडमधे अनेक खाजगी आणि गव्हर्ननेंट कॉलेज आहेत तिथे शिक्षणासाठी दुरून दुरून मुले मुली येतात. पण पोलिसांसमोर खून होताना पोलिस बघत आहेत आरोपीला पकडत नाहीत हे बघून अनेक पालकांना आपली नांदेडमधे शिकायला गेलेल्या मुलांच्या सुरक्षीततेची काळजी नक्कीच सतावत आहे. आपण नक्कीच माणूस म्हणून राहिलेलो नाही हे नक्कीच. आगामी येणारा काळ हा खुप भयंकर असणार आहे. त्यामुळे आपल्या लेकरांना सुसंस्कार द्या. पैसा जास्त झाल्यामुळे जरी तुम्हाला कुणाची गरज नसली तरी एक माणूस म्हणून माणसाचा आदर करायला मुलांना लहाणपणापासूनच शिकवा. अति लाड तर मुळीच करू नका. हट्ट नक्कीच पुरवा पन ते उच्चशिक्षणासाठी लागणाऱ्या पुस्तकांचे शैक्षणिक शुल्कांचे हट्ट पुरवा. त्यामुळे त्यांचे भविष्य चांगले घडून तो देशाचा चांगला नागरीक बनेल. आणि लग्नासाठी त्याला चांगली मुलगीदेखील मिळेल. आधुनिक काळातील पालकांनो पैसा कमी कमवला तरी चालेल पन तुमच्या मुलांना चांगला नागरीक घडवण्यासाठी त्याला वेळ द्या संस्कार द्या खुप मोठे आव्हान आहे हे तुमच्यापुढे. पहा पटतय का मनाला .... पन माणूस म्हणून आपण जगूया आणि दुसऱ्यालाही जगू देऊ या ...

शब्दांकन : **सौ. आशा सुधीर साठे,**
सैनिकपत्नी,
अहिल्यानगर. ९६०४०५६९२८



# प्रेरणादायी अक्षरधन

## अध्यात्म सर्जनशीलतेची ओळख







अध्यात्म हा शब्द उच्चारल्यावर सामान्य माणूस जरासा मागे सरकतो. थोडा भांबावतो. अध्यात्म हे काहीतरी गूढ आहे, तो आपल्या आवाक्याबाहेरचा विषय आहे, आपण त्याच्या वाटेला जाऊ नये, अशी काहीतरी समजूत करून घेतली जाते. याचे कारण अध्यात्म फार उंचीवरून आणि अनाकलनीय संकल्पनांमधून सांगितले गेले. त्यामुळे ते सामान्यांपासून काहीसे दुरावले. वास्तविक, सदाचारी, प्रापंचिक जीवन जगणारा सामान्य माणूसही आध्यात्माचा अधिकारी होऊ शकतो. आध्यात्माचा आणि जीवनाचा खूप जवळचा संबंध आहे. अध्यात्म ही केवळ विचारप्रणाली नसून ती आचारप्रणाली आहे. शुद्ध जीवनप्रणाली आहे. आचार्य विनोबाजींनी अध्यात्म ही संकल्पना फारच सोप्या पद्धतीने मांडली आहे. ते म्हणतात, 'ही अपार सृष्टी म्हणजे ईश्वराचे पुस्तक आहे. त्या सृष्टीच्या पुस्तकात पानोपानी सुंदर अक्षरांनी परमेश्वर सर्वत्र लिहिला आहे. त्या पुस्तकातील परमात्मा वाचायला आणि जाणायला शिकणे म्हणजेच अध्यात्म होय.' द्वैती जड विश्वात मानवाचे आणि मानवतेचे स्थान आणि अद्वैती चेतनावादात आत्मतत्त्वाचे भान करून देणारे समग्र ज्ञान जिथे अनुभूतीला उतरते तिथे अध्यात्म उदयास येते. भगवान श्रीकृष्णाने गीतेच्या दहाव्या अध्यायात

'अध्यात्मविद्या विद्यानाम' असे सांगत अध्यात्म ही माझी विभूती आहे, असे म्हटले आहे. खरे तर विद्या, शास्त्र आणि अनुभूती जिथे एकवटवतात तेथे अध्यात्मदर्शन उभे राहते आणि हे दर्शन जीवनदर्शन ठरते. अर्जुनाने गीतेच्या आठव्या अध्यायात भगवंताला प्रश्न केला,

किं तद् ब्रह्मं किं अध्यात्म ब्रह्म म्हणजे काय ? अध्यात्म म्हणजे काय ? आणि भगवंताने उत्तर दिले, 'अक्षरं ब्रह्म परमं स्वभावोध्यात्म उच्यते।'

अर्जुना, अविनाशी जे आहे ते ब्रह्म आणि त्या ब्रह्माची सहजस्थिती म्हणजे अध्यात्म होय. अविनाशी तत्त्वाचे अखंडत्व म्हणजे अध्यात्म. भारतीय समाजरचना ज्या तत्त्वावर आधारलेली आहे त्यात नैतिक मूल्यांना खूप महत्त्व आहे. अध्यात्म ही कुतूहलाची बाब नाही किंवा केवळ बौद्धिक भूक भागविणे हे देखील त्याचे कार्य नाही. ज्या मूल्यांच्या आधारे जीवन जगतो ती जीवनमूल्ये अनुभूतीला उतरवणे हे अध्यात्माचे प्रयोजन आहे. अध्यात्म शब्दात 'आधि' आणि 'आत्म' हे दोन शब्द आहेत. अध्यात्म म्हणजे आत्म्याविषयीचे ज्ञान होय तर अंतिम सत्य शोधून काढण्याच्या दृष्टीने केलेले अनुभवाचे मंथन म्हणजे अध्यात्मशास्त्र होय, असे गुरुवर्य मामासाहेब दांडेकरांनी म्हटले आहे. अध्यात्मशास्त्राला पराविद्या असेही म्हणतात. ते तत्त्वज्ञान वेदामध्ये उगम पावले, उपनिषदांमध्ये पूर्णत्वाला पोचले आणि भगवद्गतेने सामान्यांच्या प्रतिमेपर्यंत जाऊन पोचविले. शाश्वत अमृतत्वाचा शोध घेताना वैदिक ऋषींना 'एकं सत्य'चा साक्षात्कार झाला आणि विश्वाला व्यापणारे अविनाशी तत्त्व उमगले. विविधतेने नटलेले प्रचंड विश्व ईश्वराने निर्माण केले आहे. त्याच्या या सर्जनशीलतेस जाणणे हेच अध्यात्म होय तर त्या जाणिवेतून जीवन आनंदी बनविणे हेच त्याचे प्रयोजन होय.

**– किशोर गांधी**

# छेडछाडीविरोधात आता तातडीने मिळणार पोलीस संरक्षण

## महिला सुरक्षेसाठी 'शी-बॉक्स' पोर्टलचे अद्ययावतीकरण

नगर – कामाच्या ठिकाणी होणारा महिलांचा लैंगिक छळ रोखण्यासाठी महिला एवं बाल विकास मंत्रालय मार्फत कार्यान्वित करण्यात आलेल्या 'शी-बॉक्स' (SHe-Box) या ऑनलाइन प्रणालीची व्याप्ती आता लक्षणीयरीत्या वाढविण्यात आली आहे. अद्ययावत करण्यात आलेल्या या पोर्टलद्वारे महिलांना आता केवळ कार्यस्थळावरील छळच नव्हे, तर सार्वजनिक ठिकाणी होणाऱ्या छेडछाड, शेरेबाजी किंवा रस्त्यावरील उपद्रवी प्रकारांविरोधातही थेट तक्रार नोंदवता येणार आहे.

पूर्वी 'शी-बॉक्स' पोर्टलचा वापर प्रामुख्याने 'कार्यस्थल पर महिलाओं का यौन उत्पीड़न (रोकथाम, निषेध एवं निवारण) अधिनियम, २०१३' अंतर्गत तक्रारींसाठी मर्यादित होता. मात्र, नव्या अद्ययावतीकरणामुळे महिलांच्या सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टीनेही हे पोर्टल (https://shebox.wcd.gov.in) प्रभावी ठरणार आहे.

'शी-बॉक्स' ही केंद्र सरकारची एक एकात्मिक तक्रार नोंद प्रणाली असून, ती सरकारी, खासगी तसेच असंघटित क्षेत्रातील महिलांसाठी खुली आहे. या पोर्टलवर तक्रार नोंदवल्यानंतर ती संबंधित आंतरिक समिती किंवा स्थानिक समितीकडे स्वयंचलितपणे पाठवली जाते. देशभरातील मंत्रालये, विभाग, जिल्हे आणि पोलीस यंत्रणांशी डिजिटल जोडणी, नोडल अधिकाऱ्यांमार्फत तक्रारींचे निरीक्षण, ९० दिवसांच्या कालावधीत चौकशी पूर्ण करण्याची तरतूद, तक्रारदाराची गोपनीयता पूर्णपणे सुरक्षित ठेवणे आणि प्रकरणांच्या प्रगतीवर ऑनलाइन लक्ष ठेवण्याची सुविधा ही या पोर्टलची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत.




महिलांना अगदी सोप्या पद्धतीने ऑनलाइन तक्रार नोंदवता येते. पोर्टलवर जाऊन Register Your Complaint पर्याय निवडावा, मोबाईल क्रमांक नोंदवून जद्धझ द्वारे लॉगिन करावे, त्यानंतर स्वतःची माहिती, कार्यस्थळ किंवा घटनास्थळ, छळाचा प्रकार आणि आरोपीची माहिती भरावी. आवश्यक असल्यास पुरावे अपलोड करून तक्रार सबमिट केल्यानंतर रेफरन्स नंबरद्वारे स्थिती ट्रॅक करता येते. जर संबंधित संस्थेची IC नोंदणीकृत नसेल, तर तक्रार आपोआप जिल्हा किंवा राज्य स्तरावरील समितीकडे पाठवली जाते.

अद्ययावत प्रणालीमुळे तक्रार प्राप्त होताच संबंधित परिसरातील पोलीस ठाण्याला तातडीने माहिती पाठवली जाते. त्यामुळे प्रशासकीय विलंब टळून पोलिसांकडून त्वरित मदत मिळणे आणि संशयितांवर कायदेशीर कारवाई करणे शक्य होते.

तक्रार नोंदविल्यानंतर पोर्टलवर लॉगिन करून Track Your Complaint विभागात जाऊन रेफरन्स नंबर, मोबाईल किंवा ईमेल वापरून तक्रारीची सद्यस्थिती, चौकशीची प्रगती आणि निकाल पाहता येतो. ईमेल व एसएमएसद्वारेही अद्ययावत माहिती मिळते.

'शी-बॉक्स' पोर्टल हे सुरक्षित आणि सन्मानजनक कार्यपरिसर निर्माण करण्यासाठी तसेच सार्वजनिक ठिकाणी महिलांची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी महत्त्वाचे साधन ठरत आहे. डिजिटल यंत्रणेमुळे तक्रारींचे जलद निपटारा, पारदर्शकता आणि जबाबदारी वाढण्यास मदत होत आहे.

महिलांच्या सुरक्षेसाठी केंद्र सरकारने 'शी-बॉक्स' पोर्टल अधिक सक्षम केले आहे. महिलांनी या सुविधेचा प्रभावी वापर करून छळाविरोधात पुढे यावे. तक्रार प्राप्त होताच पोलिसांकडून तात्काळ मदत उपलब्ध करून दिली जाईल, असे आवाहन महिला व बालविकास अधिकारी संजय कदम यांनी केले आहे.



नृत्यझंकार प्रस्तुत कथकसंध्या या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

# नृत्यझंकार प्रस्तुत कथकसंध्या सादर

नगर – नृत्यझंकार प्रस्तुत कथकसंध्या या कार्यक्रमाचे ८ एप्रिल रोजी आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात नयनरम्य कथक नृत्याच्या परंपरेवर बहारदार नृत्याविष्कार सादर करण्यात आला. कार्यक्रमाच्या आरंभी नटराज पूजन करून नृत्यझंकारच्या संचालिका प्रिया ओगले-जोशी यांनी कार्यक्रमच्या प्रस्तावने मधून कथक नृत्य शैली चा अभ्यास, परंपरा, बैठक यावर मनोगत व उगवत्या कलाकारांना रंगमंच उपलब्ध करून देणे हा उद्देश सांगितला.

कलाकार व स्मार्ट एज्युकेशन च्या वंदना कुलकर्णी यांनी कला व शिक्षण, मेहनत यावर मार्गदर्शन केले.

रायमा दास हिने कथक नृत्याची माहिती सांगून नृत्यझंकार च्या विद्यार्थ्यांनीनी कथक नृत्याच्या परंपरेनुसार तीनतालात नृत्य प्रस्तुती केली.

द्यानदा लासूरे – थाट व आमद, स्वरा सुपेकर –परन, आराध्य सोनवणे– कवित्त तर गरिमा भालसिंग गतनिकास यांची वैशिट्य प्रभावीपणे सांगून कौतुक मिळवले. शेवटी सरगम प्रस्तुती केली. कथक नृत्य परीक्षेत मिळविलेल्या यशा बद्दल सर्व मुलींना गौरविण्यात आले.

तेजस्विनी येनगंदुल हिने कार्यक्रमाचे सुत्रसंचलन केले.

संगीत व संगीतकार पवन श्रीकांत नाईक, तबला हर्षद भावे, सितार स्मिता राणा, कथक पढंत व नृत्य दिग्दर्शन प्रिया ओगले–जोशी यांनी केले.

# नेप्ती जिल्हा परिषदेच्या शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात

## गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान, विद्यार्थ्यांच्या कलागुणांना ग्रामस्थांची दाद, स्नेहसंमेलनाला ग्रामस्थांचा प्रतिसाद

नगर – नगर तालुक्यातील नेप्ती येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात झाले. या स्नेहसंमेलनाचे उद्घाटन माजी सरपंच विठ्ठल जपकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा उपस्थित त्यांच्या हस्ते सन्मान करून सत्कार करण्यात आला. या स्नेहसंमेलनाला ग्रामस्थांचा प्रतिसाद मिळाला. या स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने संपूर्ण शाळावर आकर्षक विद्युत रोषणाई केली होती अशी माहिती रामदास फुले यांनी दिली.



नगर तालुक्यातील नेप्ती येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात झाले. या स्नेहसंमेलनाचे उद्घाटन माजी सरपंच विठ्ठल जपकर यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमात शाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी हिंदी, मराठी गाणी, लावण्या, नृत्याविष्कार, विविध सांस्कृतिक कार्यक्रम, नाटिका सादर करत उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणातून भारतीय संस्कृतीचे सुंदर दर्शन घडलत होते. स्नेहसंमेलन कार्यक्रम पाहण्यासाठी सरपंच, उपसरपंच, सेवा सोसायटीचे चेअरमन, व्हाईस चेअरमन, ग्रामपंचायत सदस्य, सोसायटी सदस्य, शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, माजी विद्यार्थी, मंडळाचे अध्यक्ष, सदस्य, ग्रामस्थ, महिला, पालक व परिसरातील शिक्षक उपस्थित होते.

विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट सादरीकरणाचे सर्व उपस्थितांनी कौतुक केले तसेच शाळेच्या विकासासाठी ग्रामस्थांनी भरभरून आर्थिक मदत दिली. कार्यक्रमाचे आयोजन शाळेच्या मुख्याध्यापिका आशा ढोले, बाळासाहेब कापसे, बाळासाहेब नवले, नूतन पाटोळे, सविता गोरे, राजश्री कोल्हे, मिराबाई जपकर, शिक्षक व ग्रामस्थ यांनी उत्कृष्टरीत्या केले.

यावेळी बाळासाहेब नवले यांनी शाळेत राबविण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक उपक्रमांची माहिती दिली. सरपंच सविता संजय जपकर यांनी कार्यक्रमासाठी पंचविस हजार रुपयाची देणगी दिली.

# एच टी बी टी बियाण्यावर बंदी नको, परवानगी द्या

## शेतकऱ्यांवर कारवाई न करण्या बाबत कृषी आयुक्तांना पत्र

नगर – महाराष्ट्रात कपाशीच्या एच टी बी टी बियाण्याचा वाढता प्रसार रोखण्यासाठी कृषी आयुक्तांनी समित्या नेमून कारवाई करण्याचे प्रयत्न शेतकऱ्यांवर अन्यायकारक आहेत. यात शेतकऱ्यांबरोबर, कापड उद्योग, राज्य व केंद्र सरकारचे नुकसान आहे. बंदी हटवून त्वरित प्रगत बियाण्याला परवानगी द्यावी अशी मागणी स्वतंत्र भारत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अनिल घनवट यांनी कृषी आयुक्तांना पाठविलेल्या निवेदनात म्हटले आहे.

महाराष्ट्राचे कृषी आयुक्त यांनी एक बैठक घेऊन महाराष्ट्रात झपाट्याने फैलावणाऱ्या एच टी बी टी बियाण्याची लागवड रोखण्यासाठी समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. एकट्या कृषी विभागाला एच टी बी टी बियाण्याची तस्करी रोखणे अशक्य असल्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालय व पोलिस यंत्रणेची मदत घेतली जाणार आहे.

महाराष्ट्रातील विदर्भ व मराठवाड्यात प्रामुख्याने खरीप हंगामातील मान्सूनच्या पावसावर कपाशीची लागवड केली जाते. सर्व पेरणी एकाच वेळेला झाल्यामुळे पिके खुरपणीला ही एकच वेळेला येतात. मजूर टंचाई असल्यामुळे सर्व शेतकऱ्यांना मजूर उपलब्ध होत नाही व मजुरीचा खर्च प्रचंड वाढतो. एच टी बी टी बियाण्यामुळे पिक तणमुक्त राहते व नोंदणीचा खर्च वाचल्यामुळे कपाशीचा उत्पादन खर्च कमी होतो, पिक उत्तम येते.

महाराष्ट्रात ज्या बियाण्याला बंदी आहे ते प्रामुख्याने पंतप्रधान मोदींच्या गुजरात राज्यात तयार होते. गुजरातमधील सर्व कापूस एच टी बी टी आहे. हे बियाणे तेथे राजरोस बियाण्याच्या दुकानांमध्ये उपलब्ध आहे. तेथे उत्पादन व विक्रीवर प्रतिबंध करण्यासाठी अशा समित्या तयार केल्या जात नाहीत, मग महाराष्ट्रातच हा हट्ट का? असा सवाल घनवट यांनी उपस्थित केला आहे.

एच टी बी टी बियाण्याला अधिकृत परवानगी नसल्यामुळे शेतकऱ्यांना निकृष्ट बियाणे मिळण्याची शक्यता दाट असते. सदर बियाण्याची पावती नसल्यामुळे न्यायालयात किंवा ग्राहक मंचात दाद मागता येत नाही. शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात फसवणूक होत आहे त्यामुळे एच टी बी टी बियाण्याला त्वरित मान्यता देऊन बियाण्याची कृषीसेवा केंद्रातून रीतसर विक्री होणे गरजेचे आहे.

कपाशीच्या तस्करी करून आणलेल्या बियाण्या मुळे बिजोत्पादक कंपन्यांचे बियाणे विकले जात नाहीत. भारतात फक्त बोलागार्ड १ व बोलागार्ड २ या कपाशीच्या जातीच्या जी एम बियाण्याला अधिकृत परवानगी आहे. मात्र शेतकऱ्यांची पसंती तणनाशक रोधक बियाण्याला आहे. बियाणे कंपन्यांचे बियाणे विकले जात नसल्यामुळे या कंपन्यांनी सरकारवर दबाव टाकून एच टी बी टी बियाण्याची विक्री रोखण्याचा घाट घातला आहे.

सरकारला तपासणी करून फक्त एच टी बी टी च नाही तर व्ही आई पी ३ या जनुकांची सुद्धा तपासणी करावी. ज्या बियाणे कंपन्यांच्या बियाण्यात हे प्रतिबंधित जनुक सापडेल त्यांच्यावर शासनाने कारवाई करावी. मागील वर्षी न विकलेले बियाणे पुन्हा प्रमाणित (revalidate) करण्यासाठी ( क्राय १ व क्राय २ साठी) रसशोषक किडींना रोधक असलेले जनुक व्ही आई पी ३ हे जनुक वापरले आहे. ते तपासणीत सहज उघड होऊ शकते. बियाण्याची तस्करी करणारे विक्रेते, लागवड करणारे शतकेरी तसेच व्हीप ३ वापरणाऱ्या कंपन्या सुद्धा तितक्याच दोषी आहेत. त्यांच्या बियाण्याची सुद्धा कसून तपासणी व्हावी अशी मागणी घनवट यांनी केली आहे. सरकार करणार नसेल तर स्वतंत्र भारत पक्ष अशा तपासण्या करून देईल.

शेती हा राज्याचा विषय आहे व महाराष्ट्राने या फायदेशीर नवीन तंत्रज्ञानाला प्रोत्साहन देण्या ऐवजी कारवाई करत आहे हे राज्याचं दुर्भाग्य आहे. महाराष्ट्रात जी एम बियाण्यांच्या चाचण्या घेण्यास सुद्धा बंदी आहे हे राज्याला अधोगतीकडे घेऊन जाणारा निर्णय आहे. स्वतंत्र भारत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अनिल घनवट यांनी कृषी आयुक्तांना पाठविलेल्या निवेदनात म्हटलं म्हटले आहे की एच टी बी टी बियाण्याची तस्करी रोखण्यासाठी समित्या नेमण्या ऐवजी राज्यात जी एम बियाण्यांच्या चाचण्या घेऊन या तंत्रज्ञानाला रीतसर परवानगी मिळवून देण्यासाठी केंद्र सरकारकडे शिफारस करावी. स्वतंत्र भारत पक्ष व शेतकरी संघटना एच टी बी टी बियाण्याची लागवड करण्याचे आंदोलन सुरूच ठेवणार आहे असे ही घनवट यांनी निवेदनात नमूद केले आहे. या निवेदनाच्या प्रति मुख्यमंत्री, कृषीमंत्री व पर्यावरणमंत्र्यांना पाठविण्यात आले आहे.



शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख रामजी रेपाळे यांच्या उपस्थितीत पदाधिकारी यांची बैठक आयोजित केली होती.

# शिवसेना ही जनतेच्या प्रश्नांसाठी लढणारी चळवळ; संघटन बळकट करा

## जिल्हा संपर्क प्रमुख राम रेपाळे यांचे प्रतिपादन

नगर – शिवसेना ही केवळ राजकीय पक्ष नसून ती सामान्य जनतेच्या प्रश्नांवर लढणारी चळवळ आहे. प्रत्येकाने जनतेच्या अडचणींना प्राधान्य देत काम केले पाहिजे, असे जिल्हा संपर्कप्रमुख राम रेपाळे म्हणाले. त्यांनी पक्षाच्या धोरणांवर ठाम राहून संघटन मजबूत करण्याचे आवाहन केले. पुढे बोलताना रेपाळे म्हणाले, आगामी काळात स्थानिक पातळीवर शिवसेनेचे अस्तित्व अधिक बळकट करण्यासाठी युवकांना संधी दिली जाणार आहे. समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचून त्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करणे हीच खरी शिवसेनेची ओळख आहे. त्यांनी कार्यकर्त्यांना एकजुटीने काम करण्याचे आवाहन करत आगामी निवडणुकांसाठी सज्ज राहण्याचा संदेश दिला.

जिल्हा संपर्कप्रमुख राम रेपाळे यांची निवड झाल्याबद्दल ते प्रथमच येथे आले होते. यावेळी शिवसेनेच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले

या प्रसंगी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी परिचय दिला. राम रेपाळे यांच्या उपस्थितीत पदाधिकारी यांची बैठक आयोजित केली होती. यावेळी जिल्हाप्रमुख अनिल शिंदे, शहरप्रमुख संभाजी कदम, दिलीप सातपुते, सचिन जाधव, बाळासाहेब बोराटे, गणेश कवडे, संजय शेंडगे, दत्ता जाधव, श्याम आप्पा नळकांडे, नवनाथ कातोरे यांच्यासह महिला जिल्हाप्रमुख ॲड. स्वाती जाधव, माजी महापौर सुरेखा कदम, सुवर्णा जाधव, मंगल लोखंडे, सुरेश तिवारी, संदीप दातरंगे, सचिन शिंदे, रणजित परदेशी, विकी लोखंडे, आनंदराव शेळके, चेतन शिरसुल, ओंकार फुलसौंदर, काका शेळके, ओंकार सातपुते आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# अहिल्यानगर शहराला एम्ब्रॉयडरी हब बनविणार

## पाचशे एकल महिलांना आरी वर्क, एम्ब्रॉयडरी व शिवणकामाचे मोफत प्रशिक्षण : विनायक देशमुख यांची माहिती

नगर - जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या एकल महिला सक्षमीकरण कार्यक्रमांतर्गत आता अहिल्यानगर शहरातील ५०० एकल महिलांना प्रायोगिक तत्त्वावर प्रशिक्षण देण्याचा व रोजगार निर्मितीचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे, अशी माहिती एकल महिला सक्षमीकरण समितीचे सदस्य विनायक देशमुख यांनी दिली.

याबाबत अधिक माहिती देताना श्री. देशमुख यांनी सांगितले, ना. विखे पा. यांच्या पुढाकाराने राज्यात प्रथमच अहिल्यानगर जिल्ह्यात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती वर्षाच्या निमित्ताने हे विशेष अभियान हाती घेण्यात आले. त्यानुसार पहिल्या टप्प्यात जिल्ह्यातील एकल महिलांचे सर्वेक्षण करून ग्रामीण भागातील १००० महिलांना प्रशिक्षण देऊन रोजगार- स्वयं रोजगार उपलब्ध करून देण्यात आला आहे. आता नागरी भागातही हा कार्यक्रम सुरू करण्यात येत असून त्या अंतर्गत प्रायोगिक तत्त्वावर अहिल्यानगर शहरातील ५०० एकल महिलांना आरीवर्क, एम्ब्रॉयडरी व शिवणकामाचे मोफत प्रशिक्षण दिले जाणार आहे. महिलांमध्ये आरी वर्क एम्ब्रॉयडरी व शिवणकामाचे कौशल्य उपजतच असते.प्रशिक्षणाच्या माध्यमातून त्यांचे व्यावसायिक कौशल्य विकसित करण्यात येणार आहे. सदर प्रशिक्षण झाल्यानंतर या महिलांना विविध कंपन्यांकडून काम उपलब्ध करून दिले जाणार आहे. त्या दृष्टीने मुंबईतील आणि तामिळनाडू राज्यातील तिरुपूर येथील काही कंपन्यांशी सध्या चर्चा सुरू असून महिलांना प्रतिदिन किमान रु. ५०० ते रु. १००० इतके उत्पन्न मिळेल, अशा प्रकारचा प्रयत्न करण्यात येत आहे. याशिवाय अन्य संस्थांचे आणि खाजगी आस्थापनांचे सहकार्य घेऊन या सर्व महिलांना शिवणयंत्र उपलब्ध करून देण्याचा देखील प्रयत्न सुरू आहे.



अहिल्यानगर शहरातील महिलांसाठी पूर्वी हातमाग व विडी व्यवसाय हे उत्पन्नाचे प्रमुख साधन होते. काळानुरुप हे व्यवसाय बंद पडले आहेत. त्यामुळे आता नवनवीन कौशल्याचे प्रशिक्षण देऊन महिलांसाठी उत्पन्नाचा नवा स्त्रोत निर्माण करणे आवश्यक आहे. या प्रशिक्षण व रोजगार निर्मितीच्या माध्यमातून अहिल्यानगर शहराला एम्ब्रॉयडरी हब म्हणून विकसित करण्याचा प्रयत्न असुन हे करताना एकल महिलांना विशेष प्राधान्य देण्यात येणार आहे.

या उपक्रमात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या महिलांनी आय.एस.डी.टी., ६९९९, निर्मल चेंबर्स मागे, होर्मो केअर लॅब समोर, लाल टाकी, अहिल्यानगर येथे (९३०९५८८५८०) संपर्क साधावा.

# अहिल्यानगरच्या काजल दरेकर-जंजिरे यांचे आंतरराष्ट्रीय मंचावर 'दमदार' सादरीकरण

श्रीगोंदा - काष्टी येथील काजल दरेकर-जंजिरे हिने दिल्ली येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत पेडगावच्या धर्मवीर गडावर संशोधन पत्र सादर करत महाराष्ट्राच्या ऐतिहासिक वारशाला जागतिक व्यासपीठ मिळवून दिले. तिच्या या कामगिरीमुळे स्थानिक इतिहासाला आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे.

### धर्मवीर गडाला जागतिक ओळख



'वेळ, प्रदेश आणि भूभाग' या विषयांतर्गत सादर केलेल्या संशोधनात धर्मवीर गडाचा ऐतिहासिक, भौगोलिक आणि सांस्कृतिक वारसा सखोलपणे मांडण्यात आला. किल्ल्याची स्थापत्य रचना, रणनीतिक महत्त्व तसेच स्थानिक परंपरा आणि लोकजीवनावर झालेला प्रभाव यावर विशेष भर देण्यात आला.

संशोधनानुसार, गडावरील शिवमंदिरे आणि पाण्याच्या मोटेच्या स्थापत्य शैलीवरून हा किल्ला यादवकालीन असल्याचे स्पष्ट झाले आहे. तसेच इ.स. १६६० मध्ये औरंगजेबाने या गडाचा लष्करी तळ म्हणून वापर करत 'बहादूर गड' असे नामकरण केल्याचा इतिहासही या सादरीकरणातून उलगडण्यात आला.

आजही गडाच्या भिंती, बुरुज आणि अवशेष इतिहासाच्या खुणा जिवंत ठेवत असल्याचे अधोरेखित करण्यात आले. या सादरीकरणामुळे महाराष्ट्रातील किल्ल्यांच्या समृद्ध वारशाची आंतरराष्ट्रीय स्तरावर दखल घेतली गेली आहे.

या संशोधनासाठी प्रा. नारायण गवळी, प्रा. नेहा मसालेकर, आय. पी. जंजिरे, सुनील दरेकर, प्रतिभा इंगळे व मच्छिंद्र पंडित यांचे मार्गदर्शन लाभले.



सौ.वनिता मानकर यांना छत्रपती शिवराय कर्तृत्व भुषण पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# सौ.वनिता मानकर यांना छत्रपती शिवराय कर्तृत्व भुषण पुरस्कार

नगर - आई फाउंडेशन, रायगड (भारत) व महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने स्वराज्यभूमी रायगड गौरव संमेलनात अहिल्यानगर येथील श्री जिव्हेश्वर महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ.वनिता गणेश मानकर यांना छत्रपती शिवराय कर्तृत्व भुषण पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. शाल श्रीफळ, स्मृती चिन्ह,सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप होते. याप्रसंगी कॅबिनेट मंत्री भरत गोगावले, अभिनेते संतोष पाटील, प्रमुख उपस्थिती उदय वाघेरे, संमेलनाध्यक्ष रायगड येथील आई फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. विनोदराव मोरे, स्वागताध्यक्ष प्रा.डॉ.बी.एन.खरात, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे रायगड अध्यक्ष राकेश खराडे, कोकण अध्यक्ष शैलैश पालकर, उद्योजक गणेश मानकर, रणरागिणी महिला फाउंडेशनचे अध्यक्षा रोहिणीताई पवार (अहिल्यानगर), संयोजन समितीचे सौ.श्वेता शिर्के (रायगड), राजश्री कोळी (अलिबाग), संदेश महाडिक (रायगड), प्रा.सोनाली जाधव (शिर्डी) आदी उपस्थित होते.

सौ.वनिता मानकर यांनी श्री जिव्हेश्वर महिला मंडळाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण बचत गट या माध्यमातून व सामाजिक कार्यात नेहमी सहभाग घेऊन कार्य करत असून सौ.वनिता मानकर या रांगोळी व मेहंदी आर्टिस्ट असून त्यांनी आत्तापर्यंत १०० मुलींना शिक्षण देऊन त्यातून रोजगार उपलब्ध करून दिला आहे. प्रामाणिकपणे, निष्ठेने व सातत्यपूर्ण परिश्रमांद्वारे उल्लेखनीय कार्य केले असून समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी दिलेले योगदान अत्यंत प्रेरणादायी व मोलाचे आहे. रायगडच्या ऐतिहासिक भूमीत सौ.मानकर यांच्या उत्कृष्ट कार्याची दखल घेऊन छत्रपती शिवराय कर्तृत्व भूषण पुरस्कार २०२६ या पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

# शिक्षकांनी सोशल मीडियाचा शैक्षणिक वापर समृद्ध करावा

## समर्थरत्न माजी विद्यार्थी संघाचे प्रमुख संजय कुलकर्णी यांचे प्रतिपादन : समर्थ प्रशालेत सोशल मीडिया प्रशिक्षण

नगर - तंत्रज्ञान व चॅट जीपीटीचे युग आहे. शिक्षकांनी याचा अचूक व चपखल वापर केल्यास अध्ययन-अध्यापन समृद्ध होऊ शकते.ए आयच्या काळामध्ये विविध टूल वापरून आपण शिक्षणाचा आलेख उंचावू शकतो. त्यासाठी प्रत्येक शिक्षकांनी तंत्रस्नेही होणे गरजेचे आहे. असे प्रतिपादन श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे खजिनदार व समर्थरत्न माजी विद्यार्थी संघाचे प्रमुख संजय कुलकर्णी यांनी केले.



सावेडीच्या श्री समर्थ प्रशालेच्या समर्थ सभागृहात श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाच्या वतीने संस्थेच्या चारही शाळांतील सर्व शिक्षकांसाठी तंत्रस्नेही सोशल मीडिया प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते, याप्रसंगी श्रीपाद कुलकर्णी आदी.

सावेडीच्या श्री समर्थ प्रशालेच्या समर्थ सभागृहात श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाच्या वतीने संस्थेच्या चारही शाळांतील सर्व शिक्षकांसाठी तंत्रस्नेही सोशल मीडिया प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते, याप्रसंगी कुलकर्णी बोलत होते. याप्रसंगी संस्थेचे व्हाईस चेअरमन श्रीपाद कुलकर्णी, सचिव सुरेश क्षीरसागर, कार्यकारणी सदस्या संध्या कुलकर्णी, प्राचार्या तथा मुख्याध्यापिका वसुधा जोशी, मुख्याध्यापिका धनश्री गुंफेकर, मुख्याध्यापक सुनील कानडे, पर्यवेक्षक एल.एम. कुलकर्णी, सोशल मीडिया टीम हेड ऋग्वेद कुलकर्णी आदी उपस्थित होते.

समर्थ पूजन झाल्यानंतर प्रास्ताविकात वसुधा जोशी यांनी सोशल मीडियातील तंत्रज्ञान शिक्षण व कौशल्यांचे महत्त्व विशद केले.

प्रशिक्षणामध्ये संजय कुलकर्णी यांनी पीपीटी प्रेझेंटेशनमध्ये फेसबुक, इंस्टाग्राम, व्हाट्सअप व अन्य गतिमान सोशल मीडिया ॲपची माहिती प्रत्यक्षिकासह प्रस्तुत केली. गुगल प्ले स्टोअर वरील शिक्षकांसाठी महत्त्वाचे असलेले विविध ॲप्स शिक्षकांना प्रात्यक्षिकाद्वारे मोबाईल मध्ये डाउनलोड करून त्याची कार्यवाही देखील लगेचच सुरू झाली. ऋग्वेद कुलकर्णी यांनी चॅट जीपीटी, गुगल डॉक्युमेंट, युट्युब, जी बोर्ड यांची प्रात्यक्षिकाद्वारे माहिती दिली.

फोटो- व्हिडिओ एडिटिंग, चॅट जीपीटीचा वापर, AR व VR बॉक्सचे महत्त्व, शिक्षकांसाठी महत्त्वाचे असणारे ॲप्स याबद्दल राष्ट्रपती पुरस्कार विजेते तंत्रस्नेही शिक्षक डॉ. अमोल बागुल यांनी माहिती दिली.

क्षीरसागर यांनी विशद केले की आपल्याकडे असलेला मोबाईलचा सकारात्मक पुरेपूर वापर करून आपण विद्यार्थ्यांना आधुनिक ज्ञानसंपदा निश्चितच देऊ शकतो.

श्रीपाद कुलकर्णी यांनी नमूद केले की मोबाईलद्वारे सोशल मीडियाचा वापर करताना तारतम्य बाळगतानाच त्यातील शिक्षण क्षेत्रासाठी हवे ते मोजके शोधून व हेरून आपणअसे ई-शैक्षणिक साहित्य शाळेच्या व्यासपीठावर निश्चितच आणले पाहिजे.

प्रश्नोत्तर सत्रामध्ये शिक्षकांच्या विविध शंकांचे निरसन करण्यात आले. स्वागत एल. एम. कुलकर्णी यांनी केले. धनश्री गुंफेकर यांनी आभार मानले.

# माजी कामगार, कर्मचारी आणि अधिकारी यांचा अहिल्यानगरात 'कायनेटिक परिवार स्नेहमेळावा'

नगर - कायनेटिक इंजिनियरिंग ली. या कारखान्यातील माजी कामगार, कर्मचारी आणि अधिकारी यांचा 'कायनेटिक परिवार स्नेहमेळावा' लवकरच आयोजित करण्यात येणार असून या उपक्रमामुळे एकेकाळी एकत्र काम केलेल्या हजारो सहकाऱ्यांना पुन्हा एकत्र येतं हितगुज साधण्याची संधी मिळणार आहे असे कारखान्याचे माजी अधिकारी जयंत येलुलकर यांनी सांगितले.

अधिक माहिती देताना येलुलकर म्हणाले की, एकेकाळी साडेतीन चार हजार कामगारांनी गजबजलेला कायनेटिकचा कारखाना म्हणजे जणू एक छोटे गावच होते. उत्पादनाच्या गडगडाटात, कामाच्या शिस्तीत आणि परस्पर स्नेहात घडलेले हे नाते आजही तितकेच जिवंत आहे. गेल्या काही वर्षांत तीस, पस्तीस वर्षे सेवा दिलेले येथील अनेक कर्मचारी निवृत्त झाले असून ते शहरात, राज्यात तसेच देशभर विविध ठिकाणी वास्तव्यास आहेत. या सर्वांना पुन्हा एकत्र आणण्याच्या उद्देशाने या स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात येत आहे.

### जुन्या आठवणींना उजाळा, सहकाऱ्यांशी हितगुज

या मेळाव्यात जुन्या आठवणींना उजाळा देत अनुभवांची देवाणघेवाण, गौरव, डिरेक्टरी, मैत्रीच्या बंधांना नवी उभारी, तसेच गरजू सहकाऱ्यांना मदतीचा हात देत त्यांच्या सुख दुःखात सहभागी होताना सामाजिक कृतज्ञतेचा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

अहिल्यानगरच्या औद्योगिक विकासात कायनेटिक इंजिनियरिंगचे योगदान राहिले आहे. विशेषतः कायनेटिकचे संस्थापक स्व.एच के फिरोदिया यांची निर्मिती असलेल्या लुना या स्वयंचलित दुचाकी वाहनाच्या निर्मितीमुळे औद्योगिक क्रांती घडली या उद्योगाने शहराचे नाव जागतिक पातळीवर पोहोचवले. या कारखान्यामुळे हजारो युवकांना रोजगार मिळाला आणि अनेक कुटुंबांच्या आयुष्यात समृद्धीचे दिवस आले.

सदर स्नेहमेळाव्यासाठी देशाच्या विविध भागांत विखुरलेले तसेच आपल्या गावात निवृत्तीचे आयुष्य जगणारे कर्मचारी, अधिकारी यांना सहभागी करून घेण्यासाठी व्यापक नियोजन करण्यात येत आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विविध समित्यांची स्थापना करण्यात येणार असून माजी कर्मचारी व अधिकारी यांचा सहभाग राहणार आहे.

लवकरच या संदर्भात बैठकीचे आयोजन करण्यात येणार असून मेळाव्याच्या यशस्वितेसाठी अनेकांचा सहभाग आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी संबंधितांनी ९६०७३९५१७३,९८२२०९६९६१ असे क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

हा मेळावा केवळ भेटीगाठींचा कार्यक्रम नसून, 'एक कुटुंब पुन्हा एकत्र येण्याचा भावनिक सोहळा' ठरणार असल्याची भावना व्यक्त होत आहे.

# महाराष्ट्र भूषण आदर्श शिक्षक पुरस्काराने प्रसाद शिंदे यांचा गौरव



नगर - समता प्रतिष्ठानच्या (महाराष्ट्र राज्य) वतीने शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल प्रसाद शिंदे यांनामहाराष्ट्र भूषण आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. नुकतेच झालेल्या शिक्षकांच्या सन्मान सोहळ्यात पदवीधर आमदार सत्यजित तांबे यांच्या हस्ते शिंदे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.

आमदार सत्यजित तांबे यांनी शिंदे यांच्या कार्याचे कौतुक करुन समाज घडविण्याच्या प्रक्रियेत शिक्षकाची भूमिका कणा मानली जाते. शिंदे यांनी आपल्या कर्तृत्वातून ज्ञानदानाबरोबरच विद्यार्थ्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणला आहे. अशा निष्ठावान शिक्षकांचा सन्मान करणे हे समाजाचे कर्तव्य आहे. त्यांचे कार्य इतर शिक्षकांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरणार असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

# खरीप हंगामासाठी खतांचा पुरेसा साठा उपलब्ध ठेवा

## जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया

नगर - खरीप हंगाम २०२६-२७ मध्ये शेतकऱ्यांना वेळेत व पुरेशा प्रमाणात खते उपलब्ध होण्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने वितरण करण्यात यावे. खतांचा तुटवडा निर्माण होणार नाही याची दक्षता घेत काळाबाजार, साठेबाजी व अनियमितता रोखण्यासाठी कठोर उपाययोजना राबविण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित 'जिल्हास्तरीय कृषी निविष्ठा नियोजन व वितरण व्यवस्थापन समिती'च्या बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, कृषी विकास अधिकारी सुधीर शिंदे यांच्यासह सर्व तालुका कृषी अधिकारी, खत उत्पादक कंपन्यांचे प्रतिनिधी तसेच कृषी विभागाचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया पुढे म्हणाले की, जिल्ह्यात खतांची टंचाई निर्माण होणार नाही, याची कृषी विभागाने दक्षता घ्यावी. शेतकऱ्यांना खतांचे समान वितरण होईल यादृष्टीने सुयोग्य नियोजन करण्यात यावे. खतांची जादा दराने विक्री, खतांचे लिंकिंग असे गैरप्रकार आढळून आल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात यावी, असे स्पष्ट निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

या बैठकीत जिल्ह्यातील खत साठ्याची सद्यस्थिती, मागणी, मंजूर आवंटन आणि संरक्षित (बफर) साठा यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. सध्या जिल्ह्यात १९ हजार ६७४ मेट्रिक टन युरिया, ८ हजार ७४३ मेट्रिक टन डीएपी, ४ हजार ८३६ मेट्रिक टन एमओपी, ८८ हजार ६९१ मेट्रिक टन संयुक्त खते तसेच २५ हजार ६३३ मेट्रिक टन एसएसपी असा एकूण १ लाख ४७ हजार ६३५ मेट्रिक टन खत साठा शिल्लक आहे. तसेच आगामी हंगामासाठी एकूण ७ हजार ९०० मेट्रिक टन युरिया व ८५० मेट्रिक टन डीएपी खताचा संरक्षित (बफर) साठा ठेवण्यात आला आहे.

तालुकानिहाय युरिया बफर साठ्याचे नियोजन करण्यात आले असून, त्यानुसार नगर - ५१३ मेट्रिक टन, पारनेर - ५३७, पाथर्डी - ५५८, जामखेड - ५२६, श्रीगोंदा - ५७१, कर्जत - ५५८, श्रीरामपूर - ४९५, राहुरी - ४८६, नेवासा - ५९६, शेवगाव - ५९६, संगमनेर - ६६०, अकोले - ७७७, कोपरगाव - ५२८ व राहाता - ४५० मेट्रिक टन असे नियोजन करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांनी दिली.

# खरीप हंगाम २०२५-२६ अंतर्गत धान्य खरेदीस प्रारंभ

## शेतकऱ्यांनी नोंदणी करण्याचे आवाहन

नगर - राज्य शासनाच्या वतीने महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ, मुंबई मार्फत खरीप हंगाम २०२५-२६ अंतर्गत केंद्र शासनाने निश्चित केलेल्या आधारभूत दरानुसार मका, बाजरी, रागी, ज्वारी (मालदांडी व संकरीत) या पिकांची खरेदी सुरू करण्यात आली आहे. याची नोंदणी १ ते ३० एप्रिल या कालावधीत करता येईल, तर प्रत्यक्ष खरेदी १ मे ते ३० जून पर्यंत राहील, अशी माहिती जिल्हा पणन अधिकारी एच.डी. पवार यांनी दिली आहे.

### भरडधान्यांचा हमीभाव खालीलप्रमाणे

मका २ हजार ४०० रुपये प्रति क्विंटल, बाजरी २ हजार ७७५ रुपये, रागी ४ हजार ८८६ रुपये, ज्वारी मालदांडी ३ हजार ७४९ रुपये व ज्वारी संकरीत ३ हजार ६९९ रुपये या दराने खरेदी करण्यात येणार आहे. जिल्ह्यात कृषी विभागामार्फत प्राप्त पीक पेरणीच्या माहितीनुसार मका व ज्वारी खरेदीसाठी विविध खरेदी केंद्रांवर शेतकऱ्यांची नोंदणी व प्रत्यक्ष खरेदी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. तसेच ज्या तालुक्यांमध्ये अद्याप खरेदीदार संस्था नाहीत, त्या तालुक्यांना जवळील खरेदी केंद्रांशी जोडण्यात आले आहे.

जिल्ह्यात अहिल्यानगर तालुक्यासाठी साईकृपा पणन सहकारी संस्था; श्रीगोंदा तालुक्यासाठी संभाजीराजे बहुउद्देशीय सहकारी संस्था (घुटेवाडी), सखुबाई विविध कार्यकारी सेवा सोसायटी (घोगरगाव) व श्रीदत्तकृपा पणन सहकारी संस्था मर्यादित (घारगाव); कर्जत तालुक्यासाठी अंध दिव्यांग उद्योजक सेवाभावी संस्था (मिरजगाव); पाथर्डी तालुक्यासाठी अकोले परिसर सहकारी दूध उत्पादक सहकारी संस्था (अकोले) तर कोपरगाव तालुक्यासाठी बहादराबाद विविध कार्यकारी सहकारी सोसायटी (रांजणगाव देशमुख) येथे नोंदणी व खरेदी केली जाणार आहे.

तसेच पारनेर, राहाता व राहुरी या तालुक्यांमधील शेतकऱ्यांना जवळील खरेदी केंद्रांशी संलग्न करण्यात आले असून, श्रीगोंदा केंद्राशी पारनेर, कोपरगाव केंद्राशी राहाता आणि पाथर्डी केंद्राशी राहुरी तालुके जोडण्यात आले आहेत. त्यामुळे संबंधित तालुक्यांतील शेतकऱ्यांनी जवळील खरेदी केंद्रावर जाऊन नोंदणी करून आपल्या पिकांची विक्री करावी, असेही कळविण्यात आले आहे.

# सकल मुस्लिम युवकचे महानगर शहराध्यक्षपदी अलतमश जरीवाला

नगर - सकल मुस्लिम युवक महाराष्ट्र संघटनेच्या अ.नगर महानगर शहराध्यक्षपदी अल्तमश सलीम जरीवाला यांची निवड करण्यात आली आहे. ही निवड प्रदेशाध्यक्ष अझरुद्दीन सय्यद यांच्या मान्यतेने आणि उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष मिरान पठाण यांच्या नेतृत्वाखाली जाहीर करण्यात आली.



अलतमश जरीवाला यांनी महानगरपालिकेच्या गलथान कारभारा विरोधात वेळोवेळी आंदोलने उभी केली, अधिकाऱ्यांना जाब विचारला आणि नागरिकांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी सतत संघर्ष केला. महापालिका निवडणुकीत पक्षाची साथ किंवा धनशक्ती नसतानाही त्यांनी मिळवलेला जनतेचा पाठिंबा हा पारंपरिक राजकारणाला दिलेला थेट इशारा होता. काम करणाऱ्यालाच साथ हा संदेश त्यांनी मतपेटीतून सिद्ध करून दाखवला अशी माहिती त्यांनी दिली.

अल्तमश जरीवाला यांच्या नेतृत्वाखाली आता शहरातील युवक संघटित होऊन अन्यायाविरुद्ध उभे राहतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. शिक्षण, रोजगार, नागरी सुविधा आणि अल्पसंख्याक समाजाच्या प्रश्नांवर आक्रमक भूमिका घेत संघर्ष अधिक तीव्र केला जाणार आहे. शहरातील प्रलंबित प्रश्न, भ्रष्टाचार, आणि जनतेकडे दुर्लक्ष करणाऱ्या यंत्रणे विरोधात आता थेट लढा उभारला जाणार आहे असेही ते म्हणाले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.




# छातीत दुखतंय?

व्याधी विचार

झोपेत असताना किंवा मध्यरात्री अचानक छातीत तीव्र वेदना जाणवत असतील, तर त्याकडे दुर्लक्ष करणे धोकादायक ठरू शकते. अनेक लोक याला गॅस, ॲसिडिटी किंवा थकवा समजून दुर्लक्ष करतात. रात्री वारंवार छातीत वेदना होणे ही एखाद्या गंभीर आजाराची, अगदी हार्ट अटॅकचीही खूण असू शकते. रात्री छातीत होणारी तीव्र वेदना कधी धोकादायक ठरू शकते. छातीत वारंवार वेदना होत असेल तर तपासणी करणे आवश्यक ठरते. विशेषतः झोपेत असताना वेदनेमुळे जाग येणे हा एक इशारा मानली जातो.

हृदयापर्यंत रक्त पोहोचवणाऱ्या धमन्या अरुंद झाल्यास हृदयाच्या स्नायूंना पुरेसा ऑक्सिजन मिळत नाही आणि छातीत दाब किंवा वेदना जाणवते. ही वेदना विश्रांतीच्या अवस्थेत किंवा झोपेतही होऊ शकते आणि हार्ट अटॅकचा धोका वाढवू शकते.

झोपलेल्या अवस्थेत पोटातील आम्ल वरच्या दिशेने येऊ शकते. त्यामुळे छातीत जळजळ किंवा दाब जाणवतो. ही वेदना दोन-तीन दिवसांपेक्षा जास्त काळ टिकून राहिली, तर डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

रक्तदाब अचानक खूप वाढल्यास छातीत तीव्र वेदना होऊ शकते. तसेच प्ल्युरिसी सारख्या स्थितीत श्वास घेताना छातीत टोचल्यासारखे वाटते. छातीत खूप तीव्र किंवा टोचणारी वेदना, अचानक मळमळ होणे, थंड घाम येणे, झोपल्यावर श्वास घेण्यास त्रास होणे, गरगरणे किंवा बेशुद्ध होणे, हृदयाचे ठोके अनियमित होणे ही हार्ट अटॅक (हृदयविकाराचा झटका) ची लक्षणे असू शकतात. वेळेवर उपचार न मिळाल्यास ती जीवघेणी ठरू शकतात. यापैकी कोणतीही लक्षणे दिसली तर वेळ न दवडता त्वरित डॉक्टरांशी संपर्क साधा. जास्त त्रास जाणवत असेल, तर आपत्कालीन हेल्पलाइनची मदत घ्या.



# खांदेदुखी टाळा, निरोगी राहा

सांधेविकार



खांद्याच्या दुखण्यामागे बरीच कारणं असू शकतात. दुखापत, सातत्याने होणारी हालचाल, वजनदार वस्तू उचलणं, अपघात, खेळणं किंवा वाढतं वय या कारणांमुळे खांद्यांचं दुखणं उद्भवू शकतं. खांद्याच्या दुखण्यामुळे हातांच्या हालचालींवरही मर्यादा येतात. खांद्यांमध्ये तीन महत्त्वाची हाडं असतात. ही हाडं खांद्यांच्या सांध्यांशी जोडलेली असतात. खांद्याच्या कोणत्याही भागात या वेदना जाणवू शकतात.

व्यायामाने या वेदनांवर नियंत्रण मिळवता येतं. इतकंच नाही तर, या व्यायामाचे दीर्घकालीन लाभही आहेत. व्यायामामुळे स्नायू लवचिक व्हायला मदत होते. खांदे मागून पुढे फिरवणं, बालासन, खांद्यांचे स्नायू ताणणं, डंबेल्स उचलणं अशा व्यायामांमुळे लाभ होऊ शकतात. हे सर्व व्यायाम अगदी सोप्या पद्धतीने करता येतात. शिवाय ते तुम्ही कुठेही करू शकता. हे व्यायाम नियमित केल्यामुळे वेदना बऱ्याच प्रमाणात कमीह होऊ शकतात.

खांदा बराच काळ दुखत असेल तर त्याकडे दुर्लक्ष करू नये. खांद्याच्या व्यायामांनी आराम मिळाला तर डॉक्टरांकडे जाण्याची गरज लागणार नाही. पण खांद्यांमध्ये सूज, तीव्र स्वरूपाच्या वेदना, हात आणि खांद्यांमध्ये जाणवणारा अशक्तपणा, हातांमधल्या संवेदना जाणं, खांद्यांमध्ये हालचाल करताना त्रास होणं अशी लक्षणं दिसत असतील तर तातडीने डॉक्टरांकडे जायला हवं.

खांद्याच्या दुखण्यावर काही घरगुती उपाय करता येतील. अनेकदा जीवनशैली, चुकीच्या पद्धतीने बसणं, झोपणं यामुळे खांद्यांचं दुखणं उद्भवतं. त्यामुळे आपण जीवनशैलीत सकारात्मक बदल करणं गरजेचं आहे. नियमित व्यायाम करणं गरजेचं आहे. खांदेदुखीला कारणीभूत ठरणाऱ्या गोष्टी टाळायला हव्यात. खांद्यांमध्ये दाह जाणवत असेल तर दाह कमी करणारी औषधं घेता येतील. अन्यथा, हिरव्या पालेभाज्या, टोमॅटो, ऑलिव्ह ऑईल, मासे, स्ट्रॉबेरी, संत्री, ब्लूबेरी अशी फळं यांचा आहारात समावेश करायला हवा. दुखापत गंभीर स्वरूपाची असल्यास शस्त्रक्रियेची गरज लागू शकते. खांदेदुखी तीव्र स्वरूपाची नसेल तर गरम आणि गार पाण्याचा शेकही देता येईल.

खांद्याच्या दुखण्याची अनेक कारणं आहेत. या कारणांचा शोध घेणं गरजेचं आहे. नेमकं निदान करून त्यावर उपचार होणं आवश्यक असल्यामुळे याकडे अजिबात दुर्लक्ष करू नका. डॉक्टरांचा सल्ला घ्या आणि निरोगी आयुष्य जगा.

# हेडफोन मुळे श्रवणशक्ती कमी

आरोग्यवेध

हेडफोन आणि इअरफोनचा वाढता वापर तरुणांच्या श्रवणशक्तीवर दुष्परिणाम करत आहे. वारंवार इअरफोनचा वापर, जास्त वेळ डिजिटल उपकरणांवर घालवणे आणि शहरांमध्ये वाढलेली आवाजाची पातळी यामुळे २० ते ३० वयोगटातील तरुणांमध्ये श्रवणविषयक समस्या वाढत आहेत. योग्य वेळी प्रतिबंधात्मक उपाय न केल्यास ही समस्या पुढे जाऊन कायमस्वरूपी श्रवणशक्ती कमी होण्याचे मुख्य कारण ठरू शकते. आजच्या डिजिटल युगात अनेक तरुण दररोज कामाच्या ठिकाणी, फावल्या वेळेत तसेच प्रवासात संगीत ऐकण्यासाठी, गेमिंग किंवा ऑनलाइन कंटेंट पाहण्यासाठी तासन् तास इअरफोनचा वापर करतात; मात्र सतत मोठ्या आवाजाच्या संपर्कात राहिल्याने कानांना विश्रांती मिळत नाही. यामुळे कानाच्या आतील संवेदनशील संरचनेवर परिणाम होऊन श्रवणशक्ती कमी होण्याचा धोका वाढतो.

इअरफोन्स हा प्रत्येकाच्या दैनंदिन जीवनाचा एक अविभाज्य भाग ठरला आहे; परंतु त्याच्या जास्त आवाजामुळे कालांतराने श्रवणशक्तीला हानी पोहोचू शकते. आपल्या कानाच्या आतील भागात नाजूक संवेदी पेशी असतात. त्या मेंदूसाठी ध्वनीच्या माध्यमातून सिग्नल पोहोचवणाचे काम करतात. मोठ्या आवाजाच्या सततच्या संपर्कामुळे या पेशींचे कायमचे नुकसान होऊ शकते आणि एकदा प्रभावित झाल्या की त्या पुन्हा निर्माण होऊ शकत नाहीत. दरमहा, २०-३० वयोगटातील जवळजवळ ६० टक्के व्यक्तींना हेडफोन्सचा दीर्घकाळ वापर आणि मोठ्या आवाजाच्या वारंवार संपर्कामुळे श्रवण क्षमता कमी झाल्याची लक्षणे दिसून येतात.



साठ टक्के तरुण कानात सतत आवाज येणे (टिनिटस), संभाषण स्पष्ट ऐकू न येणे किंवा मोबाईल-लॅपटॉपवरील आवाज वारंवार वाढवण्याची गरज भासणे अशा तक्रारी नोंदवतात. अशा सवयी दीर्घकाळ आढळल्यास भविष्यात कायमस्वरूपी श्रवणशक्ती कमी होण्याचा धोका वाढू शकतो. शहरी वातावरणातील वाढत्या आवाजाच्या पातळीमुळेही ही समस्या तीव्रतेने वाढत आहे. वाहतूक कोंडी, वाहनांचा आवाज, सुरू असलेली बांधकामे आणि सार्वजनिक ठिकाणांवरील गोंगाट यामुळे बरेचजण कामातील हेडफोन्सचा आवाज वाढवतात. त्याचा थेट परिणाम कानांवर होतो.


श्रवणक्षमता चांगली रहावी यासाठी चांगल्या सवयी अंगीकारणे अत्यंत आवश्यक आहे. इअरफोनचा आवाज मध्यम पातळीवर ठेवणे, सलग हेडफोन्सचा वापर टाळणे, अधूनमधुन विश्रांती घेणे, गोंगाट असलेल्या जागी संरक्षणात्मक उपाय करणे यामुळे श्रवणशक्तीचे संरक्षण करता येते. तसेच इअरफोनचा जास्त वापर करणाऱ्यांनी नियमित श्रवण तपासणी करून घेणे गरजेचे आहे.

# आतड्यातील जीवाणू वाढवतात कॅन्सरचा धोका

व्याधी विकार

जगभरात कॅन्सरचे प्रमाण झपाट्याने वाढत आहेत. अमेरिकेतील शास्त्रज्ञांनी एक महत्त्वपूर्ण शोध लावला आहे, त्यात असे स्पष्ट करण्यात आले आहे, की आतड्यांमध्ये राहणारे काही बॅक्टेरिया कोलन कॅन्सरचा धोका वाढवू शकतात. या संशोधनात प्रथमच स्पष्टपणे समजावून सांगण्यात आले आहे, की हे जीवाणू शरीराच्या डीएनएला कशाप्रकारे हानी पोहोचवतात.

आतड्यांमध्ये असलेले काही बॅक्टेरिया एक विषारी पदार्थ तयार करतात. त्याला कोलिबॅक्टिन असे म्हणतात. हा टॉक्सिन विशेष प्रकारच्या ई. कोली जीवाणूद्वारे तयार केला जातो. सामान्यतः हे जीवाणू आपल्या गट मायक्रोबायोमचा भाग असतात आणि पचनक्रियेत मदत करतात; पण काही परिस्थितींमध्ये ते हानिकारक ठरू शकतात. शास्त्रज्ञांना आधीपासूनच माहिती होती, की कोलिबॅक्टिन डीएनएला हानी पोहोचवू शकतो आणि त्याचा संबंध कोलोरेक्टल कॅन्सरशी असू शकतो; मात्र,या टॉक्सिनचा अभ्यास करणे सोपे नव्हते, कारण तो अत्यंत अस्थिर असून लवकर विघटित होतो. या नव्या संशोधनात संशोधकांनी 'मास स्पेक्ट्रोमेट्री' आणि 'न्यूक्लियर मॅग्नेटिक रेझोनन्स'सारख्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने या टॉक्सिनचा सखोल अभ्यास केला. त्यांना कोलिबॅक्टिन डीएनएवर अनियमित पद्धतीने परिणाम करत नाही तर तो विशिष्ट भागांना लक्ष्य करतो, असे आढळून आले. हा टॉक्सिन डीएनएच्या ॲडेनिन आणि थायमिनचे प्रमाण जास्त असणाऱ्या भागांवर परिणाम करतो. कोलिबॅक्टिन डीएनएच्या दोन्ही स्ट्रँड्सना एकमेकांशी जोडतो. त्याला वैज्ञानिक 'इंटरस्ट्रँड क्रॉस-लिंक' असे म्हणतात. त्यामुळे डीएनए योग्य प्रकारे कॉपी किंवा दुरुस्त होऊ शकत नाही, आणि यामुळे कॅन्सर होण्याची शक्यता वाढते. या संशोधनात हेही समोर आले, की हा टॉक्सिन डीएनएच्या 'मायनर ग्रूव्ह' नावाच्या भागात जाऊन चिकटतो.



त्याची रासायनिक रचना अशी असते, की तो अगदी योग्य ठिकाणी बसून अधिक नुकसान करू शकतो. शास्त्रज्ञांनी याची तुलना 'लॉक-अँड-की' यंत्रणेशी केली आहे. हा शोध महत्त्वाचा आहे, कारण त्यामुळे 'कोलोरेक्टल कॅन्सर'च्या रुग्णांमध्ये सारखे डीएनए बदल का दिसतात, हे समजण्यास मदत होते.

# घामापासून करा बचाव

आरोग्य चर्चा

उन्हाळ्यात घाम येणे ही सर्वात त्रासदायक गोष्ट असते. घाम येणे ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. ती शरीराचे तापमान नियंत्रित करण्यास मदत करते. या घामामध्ये पाणी, मीठ आणि काही विषारी घटक असतात. उन्हाळ्यात तापमान वाढल्यामुळे शरीर थंड ठेवण्यासाठी जास्त घाम येतो; पण बऱ्याच लोकांसाठी, जास्त घाम येणे ही एक समस्या बनते. सतत घाम येण्यामुळे खाज सुटणे, पुरळ येणे आणि ॲलर्जी यांसारख्या त्वचेच्या समस्या उद्भवू शकतात. योग्य काळजी घेतली नाही तर समस्या आणखी वाढू शकतात.

अनेकांना उन्हाळ्यात जास्त घाम येतो. त्यामुळे जिवाणू आणि बुरशीची वाढ होऊन ॲलर्जीसारख्या समस्या उद्भवतात. खूप घाम येत असेल, तर दिवसातून किमान दोनदा अंघोळ करा आणि घाम आल्यानंतर त्वचा स्वच्छ करून कोरडी करा. त्वचेला श्वास घेता, यावा यासाठी सुती कपडे वापरा.



उन्हाळ्यात कधीही सिंथेटिक किंवा घट्ट कपडे घालू नका. कारण ते घाम रोखतात आणि ॲलर्जीच्या समस्या वाढवतात. उन्हाळ्यात हलके, सैल सुती कपडे घाला. या कपड्यांमध्ये घाम आला तरी ते लवकर सुकतात आणि त्यामुळे पुरळ येत नाही.

आपले शरीर आतून आणि बाहेरून थंड ठेवणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे, भरपूर पाणी प्यावे. नारळाचे पाणी, ताक आणि टरबूज व काकडीसारखी फळे यांचे सेवन करू शकता. तसेच, या हंगामात तळलेले आणि मसालेदार पदार्थ खाणे टाळा, कारण यामुळे शरीराचे तापमान वाढून तुम्हाला जास्त घाम येऊ शकतो.

उन्हाळ्यात दिवसातून दोनदा अंघोळ करा. तसेच, त्वचेला थंडावा देण्यासाठी आणि ॲलर्जीपासून आराम मिळवण्यासाठी कडुलिंबाचे पाणी, कोरफडीचा गर किंवा चंदनाचा लेप लावा. या सोप्या उपायांमुळे उन्हाळ्यात घामामुळे होणारी लर्जी कमी करता येते आणि त्वचा निरोगी राहण्यास मदत मिळते.

# कोलेस्ट्रॉल नियंत्रण तिशीतच आवश्यक

आरोग्यमंत्र

हृदयविकारांचा वाढता धोका लक्षात घेता तज्ज्ञांनी स्पष्ट सांगितले आहे, की कोलेस्ट्रॉल नियंत्रणात ठेवण्याची सुरुवात कमी वयापासूनच करणे आवश्यक आहे. नव्या मार्गदर्शक सूचनांनुसार ३० वर्षांच्या वयापासूनच लोकांनी आपल्या 'एलडीएल' म्हणजेच वाईट कोलेस्ट्रॉल कमी करण्याचा प्रयत्न सुरू करावा आणि ते आयुष्यभर नियंत्रणात ठेवणे गरजेचे आहे.

'अमेरिकन हार्ट असोसिएशन,' 'अमेरिकन कॉलेज ऑफ कार्डिओलॉजी आणि इतर नऊ संस्थांनी मिळून हे दिशानिर्देश जाहीर केले आहेत. यामागचा उद्देश हृदयविकारांमुळे होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण कमी करणे हा आहे. तज्ज्ञांचे म्हणणे आहे, की योग्य वेळी प्रतिबंधात्मक उपाय केल्यास सुमारे ८० टक्के हृदयविकार टाळता येऊ शकतात.

या मार्गदर्शक सूचनांनुसार, कोलेस्ट्रॉलची तपासणी बालपणापासूनच सुरू व्हायला हवी. सुमारे १० वर्षांच्या वयात पहिली तपासणी करण्याची शिफारस करण्यात आली आहे, जेणेकरून आनुवंशिक कारणांमुळे कोलेस्ट्रॉल जास्त असणाऱ्यांची लवकर ओळख होऊ शकेल. अशा प्रकरणांमध्ये त्वरित उपचार सुरू करणे आवश्यक असते. त्यानंतर १८ ते २० वर्षांच्या दरम्यान पुन्हा तपासणी आणि किमान प्रत्येक पाच वर्षांनी नियमित स्क्रीनिंग करण्याचा सल्ला दिला आहे. मधुमेह किंवा उच्च 'एडीएल'ची समस्या असणाऱ्यांनी अधिक वारंवार तपासणी करणे गरजेचे आहे. उपचाराचे लक्ष्य व्यक्तीच्या जोखमीवर अवलंबून असते. सर्वसाधारणपणे, प्रत्येकाने आपले 'एलडीएल' १०० पेक्षा कमी ठेवण्याचा प्रयत्न करावा. पुढील १० वर्षांत हार्ट अटॅक किंवा स्ट्रोकचा धोका जास्त असणाऱ्यांनी ते ७० पेक्षा कमी ठेवणे आवश्यक आहे. आधीच हृदयविकाराचा झटका किंवा स्ट्रोक आला आहे अशांसाठी हे प्रमाण ५५ पेक्षा कमी ठेवण्याचा सल्ला दिला जातो. 'द न्यू यॉर्क टाईम्स'च्या अहवालानुसार, शरीरात 'एलडीएल'चे प्रमाण जितका जास्त काळ जास्त राहते, तितका हृदयविकाराचा धोका वाढतो. त्यामुळे 'जितके कमी, तितके चांगले आणि जितके जास्त काळ कमी, तितके सुरक्षित' हा सिद्धांत महत्त्वाचा मानला जात आहे.



कोलेस्ट्रॉल कमी करण्यासाठी पहिले पाऊल म्हणजे जीवनशैलीत बदल करणे. यामध्ये संतुलित आहार आणि नियमित व्यायाम यांचा समावेश होतो. आवश्यकतेनुसार स्टॅटिनसारखी औषधे आणि इतर आधुनिक उपचार दिले जाऊ शकतात. मार्गदर्शक सूचनांमध्ये असेही नमूद करण्यात आले आहे, की सप्लिमेंट्सवर अवलंबून राहणे योग्य नाही, कारण बहुतेक प्रकरणांमध्ये त्यांचा परिणाम सिद्ध झालेला नाही. यासोबतच, केवळ 'एलडीएल'ची तपासणी पुरेशी नसून एलपी(ए) नावाच्या विशेष प्रोटीनची तपासणी करणेही महत्त्वाचे आहे. कारण ते हृदयविकाराचा धोका वाढवू शकते.

आरोग्यभान

## कॅल्शियमची कमतरता असल्यास...

आता चुकीच्या जीवनशैलीचे परिणाम आपल्या आरोग्यावर होऊ लागले आहेत. आहारातल्या बदलांमुळे कमी वयात विविध आजारांना निमंत्रण मिळत आहे. हाडांच्या आरोग्यासाठी कॅल्शियम गरजेचं असतं. कॅल्शियमच्या कमतरतेमुळे हाडं ठिसूळ होऊ लागली आहेत. मात्र काही पदार्थांच्या सेवनामुळे शरीराला आवश्यक तेवढं कॅल्शियम मिळत नाही.




शीतपेयांमधल्या कार्बन डाय ऑक्साइड आणि फॉस्फरसमुळे हाडं ठिसूळ होतात. शरीरात कॅल्शियम योग्य प्रकारे शोषलं जात नाही. यासह चॉकलेटमधल्या काही घटकांमुळेही शरीरातल्या कॅल्शियमचं प्रमाण कमी होतं.


आहारात मिठाचं प्रमाण मर्यादित असायला हवं. मिठातल्या सोडियममुळे शरीरातलं कॅल्शियम मूत्रावाटे बाहेर निघून जातं. म्हणूनच मिठाचं प्रमाण कमी ठेवण्याचा सल्ला दिला जातो.

चहा-कॉफीचं अतिसेवनही शरीरासाठी घातक आहे. यातल्या कॅफेनमुळे शरीरातलं कॅल्शियम नष्ट होऊ लागतं.

जास्तीचा मांसाहारही घातक ठरू शकतो. प्राणीजन्य प्रथिनं हाडांचं नुकसान करू शकतात. त्यामुळे मांसाहारही प्रमाणात करावा.

जाणून घ्या

## स्पाँडिलायटिस सतावतोय?



सध्या स्पाँडिलायटिसचं प्रमाण वेगाने वाढत आहे. एके काळी प्रौढांना होणारा हा आजार आता तरुणांना विळख्यात घेत आहे. १०० पैकी एका तरुणाला आज स्पाँडिलायटिस आहे. त्यातही पुरुषांना हा त्रास होण्याची शक्यता जास्त असते. बैठी जीवनशैली, बसण्याच्या, झोपण्याच्या चुकीच्या पद्धती, पोषक आहाराची कमतरता, व्यायामाचा अभाव ही स्पाँडिलायटिसची कारणं आहेत. आयुर्वेदिक उपायांनी हा विकार नियंत्रणात ठेवता येईल. स्पाँडिलायटिसच्या रुग्णांनी आम्ल म्हणजे आंबट तसंच कशाय पदार्थ खाऊ नयेत. लाल मांस, आंबट फळं असे अतिआम्लयुक्त पदार्थ टाळायला हवेत. बटाट्यांमुळे शरीरात वात दोष निर्माण होतो यामुळे हाडांचं नुकसान होऊ शकतं.

स्पाँडिलायटिसमुळे जडणाऱ्या बद्धकोष्ठतेला कारक ठरणारे पदार्थ रुग्णांनी टाळायला हवेत. बद्धकोष्ठतेमुळे मानेतल्या वेदनांचं प्रमाण वाढतं तसंच मानेतले स्नायू आखडतात. गायीचं तूप वातशामक असतं. स्नेहापनासारख्या गायीचं तूप वापरून केल्या जाणाऱ्या उपचारांमुळे आराम पडू शकतो. औषधी तेलाने मसाज केल्यामुळेही आराम मिळू शकतो. शल्लाकी, रसना, गुग्गुळ, गुडुची, अश्वगंधा, सुंठ ही आयुर्वेदिक औषधं या विकारात उपयुक्त ठरतात.

हृदयारोग्य

## 'हार्ट फेल्युअर'चा मोठा धोका

भारतात मधुमेहानंतर हृदयरोगाचा धोका सर्वाधिक मानला जातो. मधुमेहामध्ये रुग्णाचे एकाएकी प्राण जाण्याची शक्यता कमी किंवा अगदीच नगण्य असते. मात्र हृदयरोगामध्ये हृदयविकाराचा झटका येऊन रुग्णाचे प्राण तडकाफडकीही जाऊ शकतात. विशेषत: 'हार्ट फेल्युअर'मध्ये रुग्णाचे प्राण जाण्याची शक्यता अधिक असते. त्यामुळे हृदयरोग, त्यातही 'हार्ट फेल्युअर' अधिक गंभीर मानला जातो. पण डॉक्टरांच्या मते 'हार्ट फेल्युअर' म्हणजे जीवनाचा अंत हे समीकरण आता बदलू लागलं आहे.



'हार्ट फेल्युअर'मध्ये रुग्णाच्या हृदयाचे स्नायू हळूहळू कमकुवत होत जातात आणि संपूर्ण शरीराला लागणाऱ्या रक्ताचा पुरवठा करण्यास असक्षम ठरतात. या व्याधीच्या सुरुवातीला शरीराचा रक्तपुरवठा वाढवण्यासाठी हृदय विशेष प्रयत्न करून स्वत:चा आकार वाढवतं आणि अधिक जोरात आकुंचन पावतं. याची परिणती हृदयाचा आकार वाढण्यात होते. या अवस्थेला 'एन्लार्ज्ड हार्ट' असं म्हटलं जातं. यात हृदयाच्या आकुंचन पावणाऱ्या स्नायूंचा आकार वाढतो आणि एकूणच स्नायूंचं वजनही वाढतं. यामुळे सुरुवातीला तरी हृदय अधिक जोरात रक्त 'पंप' करतं. वेगात रक्त पंप केल्यामुळे हृदयाचं 'आउटपुट' वाढतं. हृदयाने स्वत:हून केलेल्या या सुधारणेमुळे समस्या झाकली जाते, परंतु समस्येवर उत्तर शोधलं जात नाही. त्यामुळे शरीर आणि हृदय यांच्यातला ताळमेळ हरवतो. परिणामी, रुग्णामध्ये थकवा येणं, श्वसनाला त्रास होणं आणि 'हार्ट फेल्युअर'ची इतर लक्षणं दिसू लागतात. हृदयविकाराचा किंवा उच्च रक्तदाबाचा त्रास असलेल्या आणि हृदयविकाराच्या झटक्यांचा इतिहास असलेल्या रुग्णांमध्ये 'हार्ट फेल्युअर' होण्याची शक्यता अधिक असते. देशात एकूण आठ ते दहा दशलक्ष रुगण 'हार्ट फेल्युअर'मुळे त्रस्त आहेत. शहरी भागात हे प्रमाण लोकसंख्येच्या १० टक्के तर ग्रामीण भागात ते लोकसंख्येच्या चार ते पाच टक्के आहे. अमेरिकेसारख्या पाश्चिमात्य देशांच्या तुलनेत भारतात 'हार्ट फेल्युअर'ची व्याधी कमी वयात जडू शकते. भारतीय रुग्णांमध्ये हे वय सरासरी ५६ ते ६१ वर्षं असून पाश्चिमात्य देशांमध्ये ते ७२ वर्षं आहे.

# गाव नमुना ७अ व ७ब हटवण्याची प्रक्रिया बेकायदेशीर : उच्च न्यायालयाचा निर्णय

## भूमाफियांना चपराक; कुळे, भूमिहीन शेतमजूर, प्रत्यक्ष जमीन कसणारे यांच्या हक्कांची पुनर्स्थापना होणार

नगर – महाराष्ट्रातील महसूल व्यवस्थेत दीर्घकाळ सुरू असलेल्या वादग्रस्त आणि अन्यायकारक पद्धतीवर अखेर न्यायालयाने हस्तक्षेप करत ऐतिहासिक निर्णय दिला आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने गाव नमुना ७अ व ७ब हटवण्याची प्रक्रिया बेकायदेशीर ठरवत शेतकऱ्यांच्या हक्कांना पुन्हा अधोरेखित केले असल्याची माहिती ॲड. अमोल के. गवळी यांनी दिली.

२३ मार्च रोजी न्यायमूर्ती नितीन बी. सूर्यवंशी आणि वैशाली पाटील–जाधव यांच्या खंडपीठाने दिलेल्या निर्णयानुसार, गाव नमुना ७अ व ७ब पुन्हा महसूल अभिलेखात समाविष्ट करणे बंधनकारक ठरवण्यात आले आहे. या निर्णयामुळे प्रत्यक्ष जमीन कसणाऱ्या शेतकऱ्यांचे नाव पुन्हा अधिकृत नोंदीत येणार असून, त्यांच्या अस्तित्वाला कायदेशीर मान्यता मिळणार आहे. न्यायालयाने स्पष्ट शब्दांत सांगितले की, ही केवळ प्रशासकीय चूक नसून शेतकऱ्यांच्या मूलभूत हक्कांवर आघात आहे.

७/१२ उताऱ्यांचे संगणकीकरण करताना गाव नमुना ७अ व ७ब मुद्दाम वगळण्यात आल्याचा गंभीर आरोप या प्रकरणात समोर आला. यामुळे मोठ्या प्रमाणावर परिणाम झाला. प्रत्यक्ष जमीन कसणाऱ्यांचे नाव नोंदीतून गायब, खुद्द व कुळ यांची ओळख नष्ट, भूमाफियांना जमीन बळकावण्यासाठी संधी, खऱ्या शेतकऱ्यांना सरकारी योजनांपासून वंचित ठेवण्याचा मार्ग या प्रकाराला न्यायालयाने तांत्रिक त्रुटी मानण्यास नकार देत तो शेतकऱ्यांच्या अस्तित्वावरचा थेट हल्ला असल्याचे स्पष्ट केले.

रिट पिटीशन किसन नागोराव जगदाळे व इतर विरुद्ध महाराष्ट्र राज्य या प्रकरणात न्यायालयाने प्रशासनाला कडक आदेश दिले आहे की, ८ आठवड्यांच्या आत ७अ व ७ब उतारे उपलब्ध करून द्यावेत. सर्व्हे नंबरनुसार याचिकाकर्त्यांना नोंदी देणे बंधनकारक केले आहे. विलंब झाल्यास कठोर कारवाईचा इशारा दिला आहे.

हा निर्णय केवळ १४ याचिकाकर्त्यांपुरता मर्यादित नसून संपूर्ण महाराष्ट्रातील लाखो शेतकऱ्यांसाठी दिलासा देणारा ठरणार आहे. यामध्ये विशेषतः: कुळे, भूमिहीन शेतमजूर, प्रत्यक्ष जमीन कसणारे यांच्या हक्कांची पुनर्स्थापना होणार आहे. यामुळे भूमाफियांच्या गैरप्रकारांना आळा बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे, तसेच सरकारी योजनांचा लाभ खऱ्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

या निर्णयानंतर ॲड. एन. एच. गुगळे यांनी जमाबंदी आयुक्तांना ७ एप्रिल २०२६ रोजी पत्र पाठवून संपूर्ण राज्यात ७अ७ब पुन्हा लागू करण्याची मागणी केली आहे. तात्काळ परिपत्रक काढावे, राज्यभर एकसमान अंमलबजावणी करावी, अन्यथा राज्यव्यापी आंदोलन उभारण्याचा इशारा देण्यात आला आहे. या प्रकरणात : ॲड. अमोल के. गवळी याचिकाकर्त्यांतर्फे पी. के. लाखोटिया (AGP) राज्यातर्फे ॲड. निखिल नारलावर अर्जदार यांनी महत्त्वाची भूमिका बजावत न्यायालयीन लढा प्रभावीपणे मांडला.

# मंजूर रस्त्याचे काम रखडल्याच्या निषेधार्थ ग्रामस्थांचा रास्ता रोको

## ट्रॅक्टर आडवे लावून सारोळा – खडकी रस्त्यावरील वाहतूक रोखली



नगर तालुक्यातील सारोळा – खडकी रस्ता ते दरेमळा या रस्त्याचे मंजूर असलेले काम काही शेतकऱ्यांच्या विरोधामुळे रखडले असल्याच्या निषेधार्थ रास्ता रोको करताना ग्रामस्थ.

नगर – मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून मंजूर झालेला आणि बहुतांश काम पूर्ण झालेल्या दरेमळा (सारोळा कासार, ता.नगर) रस्त्याचे अवघे १०० मीटरचे काम काही शेतकऱ्यांनी अडवल्याने हा रस्ता रखडला आहे. याबाबत तहसील कार्यालय, पोलिस प्रशासन यांना वारंवार निवेदने देवूनही तोडगा न निघाल्याने संतप्त ग्रामस्थांनी ११ एप्रिल रोजी सारोळा ते खडकी रस्त्यावर सुमारे दीड तास रास्ता रोको आंदोलन केले. ट्रॅक्टर आडवे लावून या रस्त्यावरील वाहतूक रोखण्यात आली होती. आता २५ एप्रिल पर्यंत तोडगा न निघाल्यास पुन्हा रास्ता रोको करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

सारोळा कासार शिवारात असलेला सारोळा – खडकी रस्ता ते दरेमळा या रस्त्याचे काम ७ वर्षापूर्वी तत्कालीन आमदार विजय औटी यांनी मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतून मंजूर केले होते. या रस्त्याचे बहुतांश काम पूर्णही झालेले आहे. मात्र सदर रस्ता खडकी रस्त्याला जोडण्यासाठीचे केवळ १०० ते १२५ मीटरचे काम काही शेतकऱ्यांच्या विरोधामुळे रखडलेले आहे. याबाबत गाव पातळीवर अनेक बैठका झाल्या, ग्रामसभेतही अनेकदा यावर चर्चा झाली. मात्र त्यात तोडगा न निघाल्याने ग्रामपंचायतने तसेच दरेमळा येथील ग्रामस्थांनी अनेकदा तहसील कार्यालय, नगर तालुका पोलिस ठाण्यात तक्रार अर्ज केलेले आहेत. मात्र त्यावर अद्यापही तोडगा काढण्यात आलेला नाही.

दरम्यानच्या काळात या रखडलेल्या रस्त्याच्या कामासाठी आ. काशिनाथ दाते यांनी पुन्हा १५ लाखांचा निधी मंजूर केलेला आहे. मात्र काम सुरु होत नसल्याने हा निधी माघारी जाण्याची वेळ आली आहे. सुमारे १ ते दीड किलोमीटरचा रस्ता मजबुतीकरण आणि डांबरी करण होवूनही गावातून येणाऱ्या सारोळा खडकी या मुख्य रस्त्याला तो जोडला गेला नसल्याने या परिसरातील नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

त्यामुळे संतप्त नागरिकांनी आणि महिलांनी ११ एप्रिल रोजी सकाळी सारोळा खडकी रस्त्यावर आंदोलन सुरु केले. ट्रॅक्टर आडवे लावून या रस्त्यावरील वाहतूक रोखण्यात आली. या आंदोलनाची माहिती मिळताच प्रशासनाच्या वतीने ग्राम महसूल अधिकारी सुनिल ताकटे तसेच नगर तालुका पोलिसांचे पथक त्या ठिकाणी आले. ताकटे यांनी तहसीलदार यांच्या वतीने निवेदन स्वीकारत २५ एप्रिल पर्यंत तोडगा काढण्याचे आश्वासन दिले. या आंदोलनात सरपंच आरती कडूस, ग्रामपंचायत सदस्य रवींद्र कडूस, तुकाराम ढोरे, रोहित काळे, दत्तात्रय कडूस, माजी उपसरपंच जयप्रकाश पाटील, एकनाथ कडूस, शिवाजी कडूस, ज्ञानेश्वर काळे, संजय काळे,अरुण कडूस यांच्या सह परिसरातील नागरिक सहभागी झाले होते.

# जामखेड येथे १३ एप्रिल रोजी मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर

नगर – जामखेड येथे स्व. सुंदरबाई कन्हैय्यालाल शिंगवी प्रतिष्ठान व आनंदऋषीजी नेत्रालय व शिंगवी चष्माघर यांच्या संयुक्त विद्यमाने १३ एप्रिल रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत अल्प दरात लेन्स टाकून शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

मोतीबिंदू शस्त्रक्रिया सह, कॉर्नियां, टेरिझम, रेटिना व नेत्ररोग या सर्व तपासण्या व शस्त्रक्रिया तसेच लहान मुलांचे मोतीबिंदू, तिरळेपणा, पापणी लवणे या देखील शस्त्रक्रिया महात्मा जन आरोग्य योजना द्वारे मोफत केले जातील. मधुमेह रुग्णांसाठी मागील पडदा (रेटिना) याचीही शस्त्रक्रिया केली जाईल.

शिबीरातील उपलब्ध सुविधा मोफत ऑपरेशन करुन अल्प दरात लेन्स बसविण्यात येतील. मोफत औषधोपचार, काळा चष्मा, जामखेड ते अहमदनगर येण्या–जाण्याची मोफत सोय, राहण्याची व जेवणाची सोय, आधारकार्ड किंवा रेशनकार्ड यापैकी एकाची झेरॉक्स, चालु औषधे व गोळ्या बरोबर आणाव्यात असे ट्रस्टचे सचिव अभय शिंगवी यांनी सांगितले.

ऑपरेशन झाल्यानंतर सव्वा महिना पर्यंत मोफत तपासणी केली जाईल. नांव नोंदणी आवश्यक आहे.

नांव नोंदणी शिंगवी चष्माघर, जुना कापड बाजार, महाप्रभुजी मार्ग, हॉटेल देवेंद्र बिल्डींग, अहिल्यानगर मो.नं. ९२८४०५८८५९ व शिंगवी चष्माघर, मेनरोड, जामखेड फो.नं. ९२२६१२२०६१ येथे करावी असे संचालक अजित शिंगवी यांनी सांगितले.

# पैसे दुप्पट करण्याचे आमिष दाखवत गुंतवणूकदारांची फसवणूक करणाऱ्याला अटक

नगर – समर्थ क्रॉप केअर या कंपनीत गुंतवणूक केल्यास २० महिन्यांत पैसे दुप्पट करून देण्याचे आमिष दाखवून शेकडो गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याच्या आरोपावरून दाखल असलेल्या गुन्ह्यात कंपनीचा चेअरमन प्रशांत अनिल गवळी (वय ३६, रा. लेन नंबर ३, बिजलीनगर, तुकाई दर्शन, हडपसर, पुणे) याला अटक करण्यात आली आहे. न्यायालयाने त्याला पाच दिवसांची (१५ एप्रिलपर्यंत) पोलीस कोठडी सुनावली आहे.

यासंदर्भात राकेश प्रेमेंद्र बोरगे (वय २७, रा. पंचशीलनगर, भिंगार) यांच्या फिर्यादीवरून भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात प्रशांत गवळी याच्यासह ज्योती प्रशांत गवळी, प्रकाश मांगपे, नागनाथ दगडू जाधव, गणेश सुधाकर क्षीरसागर, दत्तात्रय नामदेव बेंगडे, माया अरूण थोरात, अरूण दत्तात्रय थोरात (सर्व रा. हडपसर, पुणे), यासिन बाबू पठाण (रा. आलमगीर, भिंगार) व देविदास सावंत (रा. अहिल्यानगर) यांच्याविरूध्द या १० जणांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. फसवणूक, महाराष्ट्र ठेवीदारांच्या हितसंबंधांचे संरक्षण अधिनियम (एमपीआयडी) आदी कलमान्वये हा गुन्हा नोंदविण्यात आला होता. त्यात माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या कलमांची भर घालण्यात आली असून पुढील तपासासाठी हा गुन्हा कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्याकडे वर्ग करण्यात आला आहे. निरीक्षक गायकवाड यानी गवळी याला अटक करून १० एप्रिल रोजी न्यायालयासमोर हजर केले. न्यायालयाने त्याला ५ दिवसांची पोलिस कोठडी सुनावली.

### १०० गुंतवणूकदारांची ४.१९ कोटींची फसवणूक

या प्रकरणात आतापर्यंत सुमारे १०० गुंतवणूकदारांचे जबाब पोलिसांनी नोंदविले असून अंदाजे ४ कोटी १९ लाख ५६ हजार ६५० रूपयांची फसवणूक झाल्याचे समोर आले आहे. आणखी गुंतवणूकदारांचे जबाब नोंदविल्यानंतर फसवणुकीचा आकडा वाढण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

# माळीवाडा वेस पाडू नये म्हणून खंडपीठात याचिका दाखल

नगर – नगर शहरातील ऐतिहासिक ओळख असलेल्या माळीवाडा वेस पाडण्याच्या हालचालींविरोधात अखेर न्यायालयीन लढा उभारण्यात आला असून शिवसेना एकनाथ शिंदे पक्षाचे गटनेते दत्तात्रय कावरे यांनी छत्रपती संभाजीनगर खंडपीठात जनहित याचिका दाखल करत प्रशासनाला आव्हान दिले आहे.

दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिकेत जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त, पुरातत्त्व विभाग, पोलीस अधीक्षक आणि महापौर यांना प्रतिवादी करण्यात आले आहे.

माळीवाडा वेस ही सुमारे चारशे वर्षांची ऐतिहासिक वास्तू असून तिचे जतन करणे ही प्रशासनाची जबाबदारी असताना उलट ती पाडण्याचा निर्णय घेण्यात आल्याने सहा महिन्यांनपूर्वीच या विरोधात नितीन भुतारे यांनीही आवाज उठवले होते. त्यांनी स्वाक्षरी मोहिम राबवून हजारो नागरिकांचा पाठिंबा मिळवला होता. तरीदेखील प्रशासनाने हा विषय पुन्हा पुढे आणल्याने संशय अधिकच बळावला आहे.

महापालिकेच्या सर्वसाधारण सभेतही या मुद्द्यावर सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार खडाजंगी झाली होती. माळीवाडा परिसरातील बाळासाहेब बोराटे, सुरेखा कदम, मंगलताई लोखंडे, दत्ता कावरे नगरसेवकांनी वेस पाडण्यास विरोध दर्शवला, तर सत्ताधाऱ्यांनी पुतळ्याचे सुशोभीकरण करण्याचा मुद्दा पुढे करत वेस पाडण्याची भूमिका घेतली.

याचिकेसोबत माळीवाडा वेस ऐतिहासिक असल्याचे पुरातत्त्व विभागाचे पत्र, चारशे वर्षांचा इतिहास, तसेच यापूर्वी नागरिकांनी दाखल केलेल्या सुमारे २ हजार हरकतींचा तपशीलही न्यायालयासमोर सादर करण्यात आला आहे. या प्रकरणात ॲड. नारायण नरवडे हे बाजू मांडत असून आता न्यायालय काय निर्णय देते याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे. जिल्हाधिकारी यांनी जोपर्यंत पुरातत्त्व खात्याचा निर्णय घेत नाही तोपर्यंत सर्व विशेषतः ठेवावे असे पत्र दिले होते तर दुसरीकडे याचिका दाखल करताना कावरे यांनी दिल्लीच्या पुरातत्व विभागाचे काही दाखले सुद्धा या समवेत त्यांनी दिलेले आहे.



माजी नगरसेवक अजिंक्य बोरकर यांनी आपला वाढदिवस वंचित मुलांसमवेत अनोख्या पद्धतीने साजरा केला.

# गंगा उद्यानातील रंगली चिमुकल्यांची जत्रा

## अजिंक्य बोरकरांचा वंचित घटकांतील मुलांसोबत वाढदिवस

नगर – सामाजिक बांधिलकी जपत मा.नगरसेवक अजिंक्य बोरकर यांनी आपला वाढदिवस अनोख्या पद्धतीने साजरा केला. शहरातील उत्कर्ष बालगृह अनाथ आणि वंचित घटकांतील मुलांसोबत गंगा उद्यान येथील फनफेअरमध्ये आनंदाचे क्षण वेचले. यावेळी शेकडो चिमुकल्यांनी विविध खेळण्यांचा मनसोक्त आनंद लुटला, ज्यामुळे गंगा उद्यानात एक वेगळीच जत्रा भरल्याचे चित्र पाहायला मिळाले.

या मुलांसाठी खास व्यवस्था करण्यात आली होती. यामध्ये लहान मुलांची रेल्वे गाडी, क्रॉस व्हील, लहान मुलांचा पाळणा, बाऊन्सी, आणि अशा अनेक खेळण्यांचा समावेश होता. अजिंक्य बोरकर यांनीही मुलांमध्ये मिसळून त्यांच्या आनंदात सहभाग नोंदवला. खेळण्यांचा आनंद लुटल्यानंतर, अजिंक्य बोरकर यांनी या वंचित मुलांच्या हस्ते केक कापून आपला वाढदिवस साजरा केला. यावेळी मुलांनी टाळ्यांच्या कडकडाटात आणि 'हॅप्पी बर्थडे'च्या घोषणा देत परिसर दणाणून सोडला. केक कापल्यानंतर सर्व मुलांसाठी अत्यंत चविष्ट अशा जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती. मुलांनी या स्वादिष्ट भोजनाचा तृप्त होऊन आस्वाद घेतला.

अजिंक्य बोरकर म्हणाले की, या मुलांच्या चेहऱ्यावरील हास्य हेच माझ्यासाठी वाढदिवसाचे सर्वात मोठे गिफ्ट आहे. समाजात आपण ज्या पदावर आहोत, त्या माध्यमातून या मुलांना थोडा वेळ का होईना, पण आनंदाचे क्षण देता आले, याचे मला मनापासून समाधान आहे.

जीतू गायकवाड यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, अजिंक्य युवा प्रतिष्ठानच्या माध्यमातून नेहमीच सामाजिक कार्य केले जाते, मात्र आजचा हा उपक्रम थेट मुलांच्या मनाला स्पर्श करणारा ठरला आहे.


## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमूद केलेली मिळकत विद्यमान मालक **१. सौ. तृप्ती सचिन सुसे, २. अलका विठ्ठल सुसे, याचे जनरल मुखत्यार म्हणून श्री. सचिन विठ्ठल सुसे, सर्व रा. गोंधळे मळा, नागरदेवळे, अ.नगर** यांच्या मालकीची असून सदर मिळकतीचा व्यवहार आमच्या अशिलांबरोबर ठरलेला असून लवकरच खरेदीखत होणार आहे. विद्यमान मालक यांनी आमचे अशिलाकडून विसारादाखल रक्कम देखील स्वीकारलेली आहे. सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहे असे खरेदी देणाराचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही कोणतीही तक्रार राहु नये म्हणून या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, **कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क,हितसंबंध, ताबा, साठेखत, करारनामा, मनाई, दावा, लिज, गहाण, दान,बक्षिस, पोटगी हक्क व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यांस** त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासून **७ (सात) दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकती खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल याची नोंद घेण्यांत यावी.

**परिशिष्ट : मिळकतीचे वर्णन** :– जिल्हा अहिल्यानगर (अहमदनगर), पोटतुकडी व तालुका अहिल्यानगर (नगर) पैकी, अहिल्यानगर (अहमदनगर) जिल्हा परिषद हद्दीतील, **मौजे नागरदेवळे** येथील आलमगीर भागातील खालील वर्णनाची मिळकत –

| सर्व्हे नंबर | प्लॉट नं. | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| २४२/१ | १६/१७/१८/२७/१ | २३२.५० चौ.मीटर |
| | १६/१७/१८/२७/२ | २३२.५० चौ.मीटर |

**यापैकी अ) प्लॉट नं. १६/१७/१८/२७/१ मधील ग्राऊंड फ्लोअर वरील आर.सी.सी.पध्दतीचे बांधकाम झालेल्या (ब्लॉक) शॉप नं. ६ चे प्लॉटचे क्षेत्र ३३.०८ चौ.मीटर याचे कारपेट क्षेत्र २४.४७ चौ.मीटर व बिल्टअप क्षेत्र २९.६४ चौ.मीटर व टेरेस वापरण्याच्या हक्कासह.**

**यांसी चतुःसिमा–**

पुर्वेस – प्लॉट नं. १६/१७/१८/२७/१, दक्षिणेस – (ब्लॉक) शॉप नं. ७

पश्चिमेस – १२ मीटर रुंदीचा रस्ता, उत्तरेस – (ब्लॉक) शॉप नं. ५

**ब) प्लॉट नं. १६/१७/१८/२७/१ मधील ग्राऊंड फ्लोअर वरील आर.सी.सी.पध्दतीचे बांधकाम झालेल्या (ब्लॉक) शॉप नं. ७ चे प्लॉटचे क्षेत्र २८.९९ चौ.मीटर याचे कारपेट क्षेत्र २१.५६ चौ.मीटर व बिल्टअप क्षेत्र २६.५१ चौ.मीटर व टेरेस वापरण्याच्या हक्कासह. यांसी चतुःसिमा–**

पुर्वेस – प्लॉट नं. १६/१७/१८/२७/१, दक्षिणेस – (ब्लॉक ) शॉप नं. ८

पश्चिमेस – १२ मीटर रुंदीचा रस्ता, उत्तरेस – (ब्लॉक) शॉप नं. ६

दि.११/०४/२०२६, अहमदनगर.

**ॲड.तनवीर एम.शेख,** नोटरी पब्लिक (भारत सरकार)

**ॲड. गुफरान एफ.मोमीन, ॲड.मोहसीन आय.शेख**

कस्तुरी प्लाझा, डावरेगल्ली, अहमदनगर, मो.नं.९२७०४६४६००/८०८७७४२४२८, ९२०९५९७१५०




महात्मा ज्योतिबा फुले जयंतीनिमित अभिवादन करताना दीपक दांगट. समवेत म्हस्के सर, बाबासाहेब भुतारे, संजय जाधव, ऋषिकेश चाफे आदि.

# गोमांसाची वाहतूक करणारा पिकअप पकडला

नगर – केडगाव बायपास परिसरात गोरक्षकांनी १० एप्रिल रोजी पहाटेच्या सुमारास संशयास्पद वाहन अडवून केलेल्या तपासणीत गोवंशीय जनावरांचे मांस वाहतूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या कारवाईत १ लाख ५० हजार रूपये किमतीचे १५०० किलो गोमांस व ४ लाख रूपये किमतीचा पिकअप असा सुमारे ५ लाख ५० हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी जयवंत शहाजी शिंदे (वय २०, रा. कानडे मळा, सारसनगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी जयवंत शिंदे हे आपल्या मित्रांसह शुक्रवारी पहाटे साडेतीनच्या सुमारास केडगाव बायपास चौक येथील चाय मस्का दुकानाजवळ चहा पित उभे होते. त्यावेळी पुण्याकडून नगरच्या दिशेने येणाऱ्या पिकअप वाहनातून दुर्गंधी येत असल्याचा संशय आला. त्यामुळे शिंदे व त्यांच्या सोबत असलेले ओम महेश दोंता (रा. पाईपलाईन रस्ता, सावेडी) आणि सनी लोकेंद्र साकला (रा. सिव्हील हाडको, अहिल्यानगर) यांनी वाहनचालकाला थांबवण्याचा प्रयत्न केला. वाहन थांबवल्यानंतर चालकाकडे चौकशी केली असता त्याने आपले नाव शफीक अली खान रफीक अली खान (वय ३६, रा. क्रांती चौक, समतानगर, छत्रपती संभाजीनगर) असे सांगितले. मात्र त्याची उत्तरे संशयास्पद वाटल्याने आली. वाहनाची तपासणी करण्यात आली. तपासणी दरम्यान वाहनाच्या मागील भागात मोठ्या प्रमाणात गोवंशीय जनावरांचे मांस आढळून आले. त्यानंतर संबंधित वाहन चालकास वाहनासह कोतवाली पोलीस ठाण्यात आणण्यात आले व गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# फुले दांम्पत्य स्मारक समितीच्यावतीने महात्मा फुले जयंती उत्साहात साजरी



नगर – महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती महात्मा फुले दांम्पत्य स्मारक समितीच्या वतीने साजरी करण्यात आली. माळीवाडा येथील महात्मा फुले यांच्या पुतळ्यास आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. महात्मा फुले यांच्या नियोजित स्मारकाला विरोध करणाऱ्यांच्या निषेधार्थ घोषणा देण्यात आल्या. या अभिवादन कार्यक्रमाप्रसंगी मनपा आयुक्त यशवंत डांगे, सुरेश इथापे, स्मारक समितीचे प्रा. माणिक विधाते, किशोर डागवाले, बाळासाहेब भुजबळ, माजी उपमहापौर अनिल बोरुडे, उपमहापौर धनंजय जाधव, नगरसेवक सुरेश बनसोडे, दत्ता गाडळकर, प्रकाश भागानगरे, सुजाता पडोळे, सौ. रुपाली दातरंगे, संदीप दातरंगे, सौ.सुनंदाताई भुजबळ, पंडितराव खरपुडे, ज्ञानेश्वर रासकर, संजय खामकर, राजेंद्र पडोळे, विनोद पुंड, मनेष साठे, गोरख पडोळे, विष्णुपंत म्हस्के, डॉ. रणजीत सत्रे, अवधूत फुलसौंदर, राजेंद्र ताठे, प्रा. शिवाजी विधाते, आनंद पुंड, रोहित पठारे, रामदास फुले, ब्रिजेश ताठे, चंद्रकांत पुंड, मच्छिंद्र बनकर, कॅप्टन सुधीर पुंड, माऊली गायकवाड, अनिल इवळे, रमेश चिपाडे, ज्ञानदेव खराडे, संजय ताजणे, डॉ. दामोधर कळमकर, ॲड. गाडेकर, ॲड. अशोक गायकवाड आदी उपस्थित होते.

आमदार संग्राम जगताप म्हणाले की, सर्वत्र महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन होत असून, त्यांच्या विचाराने एकत्र येत आहे. महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या स्मारकाच्या कामाचा भूमीपूजन सोहळा झालेला असून, लवकरच महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या पूर्णाकृती पुतळा उभारणीसाठी चांगल्या पध्दतीने काम सुरु होणार असल्याची खात्री महापालिका आयुक्तांनी दिली असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रा. माणिक विधाते म्हणाले की, अंधारलेल्या समाजाला ज्ञानाचा प्रकाश देऊन महात्मा फुले यांनी शैक्षणिक क्रांती केली. शिक्षणची शक्ती त्यांनी जाणल्यामुळे बहुजन समाजासह महिलांना शिक्षण देण्याचे महत्त्वाचे कार्य त्यांनी केले. त्यांच्या प्रयत्नाने महिलांना शिक्षणाची दारे उघडी झाली. मुलींसाठी शाळा काढून स्त्री सक्षमीकरणाचा पाया त्यांनी रोवला. त्यांचे विचार जीवंत ठेऊन सर्व समाजाला प्रेरणा व स्फुर्ती देण्यासाठी शहरात उभे राहत असलेले महात्मा फुले यांचे नियोजित स्मारक दिशा देणारे ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# महात्मा फुले जयंतीचा जल्लोष, विचारांच्या ज्योतीने दुमदुमला परिसर



नगर – क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त माळीवाडा येथे उत्साहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी महात्मा फुले यांच्या पुतळ्याला पुष्प अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी श्री संत सावताश्रम शिक्षण समितीचे चेअरमन बाळासाहेब बोराटे, सेक्रेटरी प्राध्यापक सुनील जाधव, नगरसेवक परेश लोखंडे, नितीन भुतारे, मुख्याध्यापक शिंदे सर, घोलप सर, बनकर सर, पगारे मॅडम, बडे मॅडम, घोसाळे मॅडम, गाजुल मॅडम, रमेश बोरबने, अनिल शिंदे तसेच शिक्षक उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान महात्मा ज्योतीबा फुले यांच्या नावाचा विजय असो या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला व वातावरण देशभक्ती व सामाजिक जाणीवांनी भारावून गेले.

यावेळी चेअरमन बाळासाहेब बोराटे यांनी आपल्या भाषणात महात्मा फुले यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांचे आजच्या समाजातही मोठे महत्त्व असल्याचे सांगितले. शिक्षण, समानता आणि सामाजिक न्याय यासाठी त्यांनी दिलेल्या योगदानाची जाणीव प्रत्येकाने ठेवावी, असे आवाहन त्यांनी केले.

तसेच सेक्रेटरी प्राध्यापक सुनील जाधव यांनीही आपल्या मनोगतात महात्मा फुले यांच्या विचारांची आजच्या पिढीला विशेष गरज असल्याचे सांगितले. समाजातील अंधश्रद्धा, जातिभेद आणि अन्याय दूर करण्यासाठी शिक्षण हाच खरा मार्ग असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

कार्यक्रम शिस्तबद्ध व प्रेरणादायी वातावरणात पार पडला असून उपस्थितांनी महात्मा फुले यांच्या कार्याला अभिवादन करत त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा निर्धार व्यक्त केला.

